MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष एकोणिसावे / अंक २ / फेब्रुवारी २०१८

## कर्मयोगी
## डॉ. वा. ना. बेडेकर

100
डॉ. वा. ना. बेडेकर
जन्मशताब्दीवर्ष
सांगता समारंभ
१९१७–२०१७



डॉ. वा. ना. बेडेकर जन्मशताब्दीवर्ष सांगता समारंभ
शनिवार दि. १७ फेब्रुवारी २०१८ रोजी डॉ. बेडेकर विद्या मंदिर शाळेच्या पटांगणात संपन्न झाला.

# डॉ. वा. ना. बेडेकर जीवनपट

| | |
|---|---|
| २०/२/१९१७ | गोवळ (जि. रत्नागिरी, तालुका राजापूर) येथे जन्म.<br>(शनिवार व महाशिवरात्र) |
| १९३६ | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण. |
| १९४१ | एल्. सी. पी. एस्. ही वैद्यकीय पदवी (सुवर्णपदकासह) मिळाली. |
| १९४२-४३ | डहाणू, उंबरगाव येथे वैद्यकीय व्यवसायास प्रारंभ. |
| १९४४ | कु. यमुना जोशी यांचेशी विवाह. याच वर्षी विलेपार्ले येथे व्यवसाय. |
| १९४५ | ठाण्यात नौपाड्यात दवाखाना सुरू झाला.<br>याच वर्षी शैला बेडेकर यांचा जन्म (१३ नोव्हें.). |
| १९४७ | डॉ.विजय बेडेकर यांचा जन्म (९ ऑक्टोबर). |
| १९४९ | सौ. माणिक (बापट) यांचा जन्म (२६ मे). |
| १९५० | सध्याचे हॉस्पिटल. नारायण भुवनच्या तळमजल्याचे बांधकाम. |
| १९५२-५३ | उत्कर्ष मंडळाची स्थापना. |
| १९५७ | विद्या प्रसारक मंडळाच्या पुनर्रचित कार्यकारिणीचे अध्यक्ष. |
| १९५९ | शाळेचा माध्यमिक विभाग चालू झाला. |
| १९६२ | लोकसभेची निवडणूक लढवली. |
| १९६९ | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाची स्थापना. |
| १९७२ | टी.एम.सी. विधी महाविद्यालयाची स्थापना. |
| १९७३ | व्यवस्थापन विभागाची सुरुवात. |
| १९७५ | विज्ञान महविद्यालयाचे विभक्तीकरण. |
| १९७६ | सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची सुरुवात. |
| १९७९ | भारत सहकारी बँकेची स्थापना (२९ एप्रिल). |
| १९८३ | विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन सुरू झाले. |
| १९९९-२००० | बांदोडकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू. |
| २०००-२००१ | जोशी- बेडेकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू. |
| २००४ | सत्कर्म प्रतिष्ठानाची स्थापना. |
| २००४ | देहावसान (१४ एप्रिल दुपारी २.२० च्या सुमारास). |

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष एकोणिसावे/अंक २/फेब्रुवारी २०१८

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २२ वे/अंक ८ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | ३ |
| २) | भव्य स्वरुपात साजरा झालेला डॉ. वा. ना. बेडेकर जन्मशताब्दीवर्ष सांगता समारंभ! | श्री. अशोक चिटणीस | ६ |
| २) | भेट एका तंत्रनिकेतन संस्थेला | डॉ. सुधाकर आगरकर | ८ |
| ३) | आरोग्यवेध-०६ आरोग्य व स्वस्थता ह्यांचे निकष | श्री. नरेंद्र गोळे | ११ |
| ४) | गुप्तकालीन भारत : प्राचीन भारतातील 'सुवर्णयुग' | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १५ |
| ५) | आत्मचरित्राबाबत... | श्री. अरविन्द दोडे | २३ |
| ६) | तेथे कर माझे जुळती विविध क्षेत्रांतील आजची स्त्री | सौ. कांचन गणेश मोहिते | २७ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

## संपादकीय...

# 'पण लक्षात कोण घेतो!!!'

नीरव मोदी आणि विक्रम कोठारी यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या कथा सध्या गाजत आहेत. याबरोबरच कुटुंबाने सामूहिक आत्महत्या केल्याच्या अनेक बातम्याही प्रस्तृत होत असतात. त्याचप्रमाणे बेजबाबदारपणे वाहने चालवून होणाऱ्या अपघातांमुळे दगावणाऱ्या लोकांची संख्याही बेसुमार वाढतांना दिसते. एका सुसंस्कृत चांगल्या समाजाचे हे खचितच चांगले चित्र नाही, म्हणूनच याचा गांभिर्याने विचार करायला हवा.

पूर्वी निरक्षरता आणि त्यामुळे येणाऱ्या अशिक्षिततेवरच याचे खापर फोडले जाई. आज तंत्रज्ञान आणि दळणवळणांच्या साधनांमुळे देशाच्या भौगोलिक सीमा आकुंचित झाल्या आहेत आणि सगळ जगच पराकोटीचे परस्परावलंबी झाले आहे.

पाश्चात्य देशात विज्ञानाच्या शोधांमुळे दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचा प्रसार आपल्याकडे होण्यास काही दशके लागायची. हीच गोष्ट आज काही आठवड्यांवर येऊन ठेपली आहे. आंतरजालामुळे (इंटरनेट) माहितीच्या साधनांचे लोकशाहीकरण झाले आहे. शिक्षणाचेही आता चांगलेच सार्वत्रिकरण झाले आहे. भारताची साक्षरता ९० टक्क्यांच्या वरती असून पटसंख्येअभावी शाळा बंद होण्याची वेळ आली आहे. या सर्वच गोष्टी परंपरागत कारणमिमांसेला छेद देऊन वास्तवाचे एक वेगळे चित्र उभे करतात. हे वास्तव म्हणजे निरव मोदी पासून काही लाखांच्या वाहनांमधून प्रवास करून अपघात होणारे कुणीही 'अशिक्षित', 'मागासलेले' किंवा 'गरीब' नाहीत.

विसाव्या शतकामधील जग हे दोन (आर्थिक) सिद्धांतावर विभागले गेले होते. भांडवल, आणि साम्य-समाजवादी सिद्धांताचा उगम हा युरोपमधील १५ व्या १६व्या शतकातील 'वैज्ञानिक' आणि 'औद्योगिक' क्रांतीमध्ये आहे. या क्रांत्यांचा उगम हा युरोपमधील प्रबोधन युगात आहे. १९ व्या व २० व्या शतकातील युरोपची जीवनशैली, आणि जीवनमूल्ये ही या क्रांत्यांवर आधारित आहेत.

सर्वसाधारणपणे रोमन साम्राज्याचे पतन (५ वे शतक) ते १५ व्या शतकातील प्रबोधन युग, म्हणजे इतिहास कालक्रमातील मध्ययुग, हा युरोपचा अंधारयुगाचा काळ धरला जातो. याच अंधारयुगामध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रचंड प्रभाव युरोपवर होता. यामुळेच बायबल मधील वचन, आणि त्यांचे समर्थन या भोवतीच त्यांचे तत्त्वज्ञान आणि समाजसंस्कृती फिरत होती. बायबल शिक्षणाचा केंद्रबिंदू हा चर्च होता, आणि त्याचे वहन करणारे माध्यम हा त्यांचे धर्मगुरू म्हणजे 'प्रिस्ट' होते. या परिघाबाहेर विचार करणारे हे 'धर्मबाह्य' किंवा 'समाजबाह्य' ठरत होते. प्रत्यक्ष जीवनाचे वास्तव, आणि आग्रही धर्मसंकल्पना यामध्ये मोठी दरी निर्माण झाली होती. यातूनच 'प्रबोधन' युगाची सुरुवात झाली. युरोपचे ख्रिस्तपूर्व तत्त्वज्ञान हे ग्रीक संस्कृती, आणि विचारावर आधारित होते. ग्रीक संस्कृतीमधील काव्य, साहित्य, कला, शिल्प याची त्यांना चांगली माहिती होती. म्हणूनच प्रबोधन युग म्हणजे, पुन्हा त्या (ग्रीक) संस्कृतीकडे जाऊ या असा तो विचार होता. त्यातूनच १५ व्या शतकाच्या आत-बाहेर युरोपातील सुरेख स्थापत्य, शिल्प, कला, साहित्य आणि तत्त्वज्ञानाची निर्मिती झाली.

१६ व्या शतकात वसाहतवादाला सुरुवात झाली. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात सगळा देश इंग्रजांच्या

ताब्यात गेला आणि वसाहतवाद्यांची भाषा, संस्कृती आणि जीवनशैलीने आपला प्रभाव आणि वर्चस्वाने प्रस्थापित करायला सुरुवात केली. ख्रिस्ती धर्म आणि ग्रीक संस्कृतींपेक्षा दुसरी कोणती संस्कृती असू शकते हे त्यांच्या पचनी पडू शकले नाही. यामुळेच भारतीय समाज आणि त्यांच्या प्रेरणांचे आकलन त्यांच्या अभ्यासकांना झाले नाही. संस्कृत साहित्य, कला, शिल्प, स्थापत्य बघून ते स्तंभीत झाले, पण ग्रीक, आणि रोमन संस्कृतींशी त्यांची तुलना करून भारतीय सृजनाच्या प्रेरणा ते ग्रीक साहित्य आणि संस्कृतीत बघू लागले.

युरोपमधील 'अंधारयुग' म्हणजे ५ वे ते १५ वे शतक हे भारतामधले अंधारयुग नव्हते. आर्यभट्ट (५वे शतक), ब्रह्मगुप्त, १२ व्या शतकातील भास्कराचार्यांपासून १५ व्या शतकातील गणेश दैवज्ञांपर्यंत महान गणिती याच काळात होऊन गेले. भारतातील बहुतेक सगळी मंदिरशिल्पे, आणि लेणी ही देखील याच कालखंडातील आहेत. पोलाद निर्मितीपासून, वस्त्रोद्योगापर्यंतची भरभराट आणि कला, कौशल्यांचा विकास हा याच कालखंडातील आहेत. नौकानयन, जागतिक व्यापार आणि त्याची भरभराट ही याच कालखंडातील आहे. लग्नापासून, कुटुंबव्यवस्था, कौशल्यावर आधारित समाजव्यवस्था यांचे स्फूर्तीस्थान, आणि या सर्व समाजव्यवस्था एकसंघ ठेवण्याची प्रेरणा ही शुद्ध भारतीय तत्त्वज्ञानांच्या मूल्यावर आधारित होती. राजांपासून रंकापर्यंत सर्वांना ती मान्य होती. याचा अर्थ समाजात 'अनिष्ट' 'अशिष्ट' होत नव्हते असे नाही. राग, लोभ, मत्सर, त्याग यासर्व मानवी स्वभावातील गुणधर्मांचे प्रदर्शन त्याही काळात होत होते. पण 'असंस्कृतपणा'ला सामाजिक प्रतिष्ठा देण्याची व्यवस्था त्या काळात नक्कीच नव्हती. नीतिनियमांची वीण ही काही विशिष्ट मूल्यांवर आधारित होती, आणि सगळ्या शिक्षणाचा गाभा हे ते 'नीती' आणि 'मूल्यशिक्षण' होते.

१६ व्या शतकात व्यापाराकरीता आलेल्या या मंडळींनी पुढे महसुलापासून शिक्षणापर्यंत ताबा घेतला; एवढेच नाही तर, पाश्चात्य जीवनमूल्यांप्रमाणे त्याची रचना आणि अंमलबजावणीही करायला सुरुवात केली. भारताच्या दृष्टीने भारतीय संस्कृती, विचारधारा आणि जीवन पद्धती लोप पावण्याची ती सुरुवात होती. शिक्षणाच्या सरकारीकरणाची सुरुवात येथेच झाली. ''हाडामासाचे भारतीय, पण विचार-आचारांनी पाश्चात्य संस्कृतीचे वहन करणारे'', या मेकॉलेच्या संकल्पनेतील शिक्षणपद्धतीची ती सुरुवात होती. लोकांची अशी दृढ समजूत आहे की, हा बदल म्हणजे फक्त शिक्षणाच्या माध्यमांचा होता. प्रत्यक्षात एका प्राचीन संस्कृतीचे तत्त्वज्ञान, व्यवहार, चिंतन आणि जीवनशैलीच्या परिवर्तनाची ती सुरुवात होती. अर्थातच याला नवीन येऊ घातलेल्या औद्योगिकरणामुळे समर्थन आणि चालना मिळाली होती.

कौशल्यावर अवलंबलेला एकसंध समाज यामुळे विस्कळीत व्हायला लागला. नवीन औद्योगिकरणामुळे त्याचे कौशल्य संदर्भहीन होऊन त्याच्या चरितार्थाचे साधन नष्ट व्हायला लागले. खेडी उद्‌ध्वस्त होऊन नवीन शहरांचा विकास व्हायला लागला. जिवनमूल्याबरोबर जीवनशैलीच्या प्रेरणाही बदलल्या.

निदान १५ व्या शतकापर्यंत तरी भारतीय शिक्षणपद्धती ही सर्वथा भिन्न होती. बहुसंख्य समाज हा कुठल्यातरी कौशल्यावर आपले चरितार्थ चालवत असे. कालांतराने याला आपण 'बलुतेदार' म्हणू लागलो. या प्रत्येक व्यवसायाचे 'कौशल्य' हे परंपरेने चालत असे. सगळा समाज हा या कौशल्यांवर परस्परावलंबी होता. हे 'कौशल्य' आणि त्यावर आधारित 'व्यापार' याकरता प्रत्येक खेडे किंवा ज्याला आपण आज 'ग्रामव्यवस्था' म्हणतो, त्याचे पोषण करायला पुरेसे होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या कौशल्याच्या शिक्षणाचे केंद्र हे घरच होते.

मौन हीच सत्याची जननी. - बी. डिस्राएली

प्रत्येक नवीन पिढीचा 'गुरू' हे त्याचे आईवडील किंवा आप्त असत. थोडक्यात; प्रत्येक घर हेच एक 'गुरुकुल' होते. दुर्दैवाने प्राश्चात्य शिक्षित भल्या भल्या शिक्षण, आणि समाज तज्ज्ञांनासुद्धा हे शिक्षण होते असे वाटले नाही. तत्त्वज्ञान, दर्शनांचा अभ्यास आणि अनेकवेळा वैज्ञानिक आणि कलाक्षेत्रामधील विकसित अभ्यास हा मोठ्या गुरुकुलांमधून चालायचा. त्यांचे माध्यम हे संस्कृत भाषा होती. म्हणूनच भाषेच्या सखोल अभ्यासासून ते तत्त्वज्ञानाच्या कूट प्रश्नांपर्यंत एकच अधिकारी व्यक्ती म्हणजे 'गुरू' हे त्यांचे केंद्रबिंदू असे. त्यालाच आज आपण 'गुरुकुल शिक्षणपद्धती' म्हणतो. त्याकाळी इंग्लंडमध्येही सर्व शिक्षणाची भाषा ही लॅटीन होती. म्हणून इंग्रजांची अशी समजूत झाली की, भारतातील शिक्षण हे फक्त अशा गुरुकुल पद्धतीतून होत असते. त्यांना याची कल्पना नव्हती की, बाकीच्या कौशल्यांकरता संस्कृतची गरज नव्हती, आणि अशी कौशल्ये ही परंपरेतूनच आकार घेऊ शकतात, म्हणून त्यांचा विकासही प्रत्येक घरातून होत होता आणि तीही शिक्षणाचीच केंद्रे होती.

तत्त्वज्ञान, किंवा साहित्याला अक्षर किंवा भाषेच्या शिक्षणाची गरज होती. कौशल्य शिक्षणाची मुळाक्षरे आणि पुस्तके ही प्रत्यक्ष कार्यानुभवावरून विकसित होत होती. कुंभार, लोहार, सुतार यांचे शिक्षण म्हणजे त्यांचे पुस्तक हे प्रत्यक्ष कार्यानुभवच होते. बाकी त्यांच्या मानसिक, आणि सामाजिक अंगांचा विकास हा सामाजिक सण, रूढी, कीर्तन, भजन यांच्या माध्यमातून होत होता. प्रसिद्ध संस्कृतचे अभ्यासक मॅक्सम्युलर यांनी याचे अतिशय समर्पक वर्णन करून ठेवले आहे.

"There is such a thing as social education and education outside of books and this education is distinctly higher in India than in any part of Christendom. Through recitation of ancient stories and legends, through religious songs and passion plays, shows and pegents, through ceremonials and sacraments, through fairs and pilgrimages, the Hindu masses all over India receive a general culture and ecucation which are in no way lower, but positively higher than general level of culture and education received through schools and newspapers or even through the ministration of the churches in western christian lands. It is an education not in the so called three R's but in humanity".

भारतीय शिक्षण व्यवस्थेचा गाभाच यात मॅक्सम्युलर यांनी व्यक्त केला आहे.

कुठलाही समाज हा चालीरीती, रुढी, श्रद्धा, नातीगोती, सण यांच्या गुंफणीतूनच जगत असतो. मानवामानवातील संबंधांचे शिक्षण त्याला तेथेच मिळत असते. धर्मनिरपेक्षतेच्या भ्रामक संकल्पनेत आपण जगण्याचा आणि शिक्षणाचा मूळ विचारच हरवला.

चार भिंतींमधील आजचे 'धर्मनिरपेक्ष' शिक्षण हे शुद्ध माहितीच्या प्रसारणाचे केंद्र झाले आहे. आज येऊ घातलेली कृत्रिम बुद्धीमत्ता, संगणकाचा वाढत जाणारा वेग आणि संचय-क्षमता, कदाचित माणसाला या सगळ्याच व्यवहारातून हद्दपार करून टाकील. चालकाशिवायची विमाने, मोटारगाड्या आता येऊ घातल्या आहेतच. माहितीचा पुरवठा केल्यावर निदान देणारे संगणकही आता आले आहेत. दुर्दैवाने माणसाला सुसंस्कृतपणे जगायचं असेल तर 'माणूस' म्हणून लागणारी 'मूल्ये' निव्वळ माहिती त्याला देऊ शकत नाही. आजचा 'वैद्यक' किंवा 'विधीज्ञ' माहितीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेला असतो, पण या माहितीचा वापर तो सर्वमान्य नैतिकतेच्या चौकटीत करेल याची काहीही शाश्वती नसते. आजच्या शिक्षणाचा हा फार मोठा पराभवच नाही का?

माहिती मिळवणे हे कितीही महत्त्वाचे असले तरी

(पृष्ठ क्र.७ वर)

# भव्य स्वरूपात साजरा झालेला डॉ. वा. ना. बेडेकर जन्मशताब्दीवर्ष सांगता समारंभ!

विद्या प्रसारक मंडळाचे सातत्याने ४७ वर्षे अध्यक्षपद खऱ्या अर्थाने ज्यांनी भूषविले आणि पूर्व प्राथमिक ते महाविद्यालयांच्या अनेक इमारती ज्यांनी सर्वप्रकारे शैक्षणिकदृष्ट्या सुसज्ज केल्या, त्या डॉ. वा. ना. बेडेकर यांचा जन्मशताब्दी सांगता समारंभ शनिवार दि. १७ फेब्रुवारी २०१८ रोजी डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या परिसरात अविस्मरणीय स्वरूपात साजरा झाला. हा समारंभ विद्या प्रसारक मंडळातर्फे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या नेतृत्वाने व मार्गदर्शनाने अत्यंत देखणा, डॉक्टरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारा आणि शैक्षणिक विचारांना चालना देणारा होता. विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर आणि निवडक आजी-माजी विद्यार्थी असा सुमारे एक हजार भरगच्च श्रोतृसमूह कार्यक्रमास प्रारंभापासून अखेरपर्यंत उपस्थित होता. व्यासपीठावर वि. प्र. मं. च्या सर्व शैक्षणिक संस्थांचे प्रातिनिधिक स्वरूपाचे आजी-माजी प्राचार्य, मुख्याध्यापक व निवडक माजी विद्यार्थी होते. वि. प्र. मं. चे विश्वस्त श्रीनिवास जोशी, शरद वेंगुर्लेकर ठाण्यातील कौशल्य रुग्णालयाचे निर्माते व अनेक पुरस्कार प्राप्त शल्यविशारद डॉ. एच. एस. भानुशाली आणि आय. बी. एम. ह्या दूरदर्शन वाहिनीवरील प्रमुख संपादक, सुप्रसिद्ध वक्ते आणि अनेक पुरस्कार प्राप्त डॉ. बेडेकर विद्या मंदिराचे माजी विद्यार्थी डॉ. उदय निरगुडकर हे ह्या समारंभाचे विशेष अतिथी होते. डॉ. बेडेकर विद्या मंदिराचे आदर्श शिक्षक म्हणून राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त माजी मुख्याध्यापक अशोक चिटणीस यांनी कार्यक्रमांचे नेटके सूत्रसंचालन केले होते.

वि. प्र. मं. चे कार्यकारिणी सदस्य, गझल गायक आणि डॉ. बेडेकर विद्या मंदिराचे माजी विद्यार्थी अनिरुद्ध जोशी यांनी सुरेल ईशस्तवन सादर केल्यावर अशोक चिटणीस यांनी कार्यक्रमाचे स्वरूप सांगून डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या काही हृदयस्पर्शी आठवणींना उजाळा दिला. आपल्या प्रास्ताविकात डॉ. विजय बेडेकर यांनी प्रस्तुत समारंभ हा डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या चरित्रातून व चारित्र्यातून दिसणारी शिस्त, साधेपणा, जबाबदारीची जाणीव, सामाजिकता, देशप्रेम आणि आपल्या आईकडून व मामांकडून घेतलेले संस्कार या सर्वांचा मागोवा घेण्यासाठी व त्यापासून काही शिकण्यासाठी संयोजित केल्याचे सांगितले. आपल्या वडिलांच्या निधनानंतर डॉ. विजय बेडेकर यांनी वि. प्र. मंडळाची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन लंडनमध्ये ॲकेडमी ऑफ एज्युकेशन ॲण्ड रिसर्च ही संस्था २००९ मध्ये तर रत्नागिरी जिल्ह्यात वेळणेश्वर येथे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयासारखी भव्य व सुसज्ज शैक्षणिक संस्था स्थापन झाल्याची माहितीही श्रोत्यांना प्रास्ताविकातून दिली.

डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचे चित्रीकरण सादर झाल्यावर 'कर्मयोगी डॉ. वा. ना. बेडेकर' ही अत्यंत देखणी, संग्राह्य व ऐतिहासिक दस्तऐवजासारखी, सौ. प्रा. अशोक चिटणीस, डीन सौ. कालिंदी कोल्हटकर आणि सौ. अल्पना बापट संपादित स्मरणिका श्रीनिवास जोशींचे हस्ते प्रकाशित झाली. पोष्टाने काढलेला डॉ. वा. ना. बेडेकर यांचा स्टँप शरद वेंगुर्लेकर यांचे हस्ते तर डॉ. बेडेकर कुटुंबीयांसंदर्भातील कॉफीटेबल बुक डॉ. उदय निरगुडकर आणि डॉ. भानुशाली यांच्या हस्ते प्रकाशित झाले. डॉ. प्राचार्य सी. जी. पाटील, डॉ. प्रा. शकुंतला सिंग, डॉ. महेश बेडेकर, डॉ. दिलीपकुमार नायक, प्रा. सौ. श्रीविद्या जयकुमार, प्रा.

---

आरामात जीवन जगायचे असेल तर ऐकून घ्या, पाहून घ्या; पण बोलू नका. - जॉन फ्लोरिओ

बी. एन. लाड, डॉ. एच. एस. भानुशाली यांनी डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. सूत्रसंचालक प्रा. अशोक चिटणीस यांनी कॉफीटेबल बुक आणि स्टँप निर्मितीमागील डॉ. महेश बेडेकर, डॉ. आनंद बेडेकर, सौ. अल्पना बापट यांचे नियोजन कौशल्य विशद करून सौ. सुमेधा बेडेकर यांचे सुश्राव्य गाण्याविषयी गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमाचा कळसाध्याय म्हणजे डॉ. उदय निरगुडकर यांचे श्रोत्यांना विलक्षण वक्तृत्व शैलीतील वैचारिक भाषण! ते म्हणाले, ''शैक्षणिक उद्योगजगतेला ओहोटी लागली असताना शिक्षक या संस्थेचे पुनरुज्जीवन करण्यास व विद्यार्थ्यास केंद्रीभूत करण्यासाठी डॉ. वा. ना. बेडेकर यांचे स्मरण करणे आवश्यक आहे.'' डॉ. बेडेकर विद्या मंदिरातील विविध शिक्षकांनी आणि मुख्याध्यापक अशोक चिटणीस यांनी आपल्या मनावर केलेल्या संस्कारांचा उल्लेख त्यांनी केला. ''भारतभर आज अज्ञानाने ग्लानीच आलेली असून सज्जनांच्या रक्षणार्थ आणि दुष्कृत्यांचा विनाश करण्यास ज्ञानसंस्था संस्थापित करण्यास डॉ. वा. ना. बेडेकरांनी पुन्हा पुन्हा या जगात जन्मास यायला हवे!'' असे म्हणून आपल्या भाषणाचा समारोप जेव्हा डॉ. उदय निरगुडकरांनी केला तेव्हा साऱ्या श्रोतृवर्गाच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि डोळे पाणावले होते!

कार्यक्रमाच्या अखेरीस वि. प्र. मंडळाचे कार्यवाह उत्तम जोशी यांनी मोजक्या शब्दांत आभार मानले. सौ. सुमेधा बेडेकरांनी पसायदान सादर केले आणि सहभोजनानंतर अविस्मरणीय कार्यक्रमाची सांगता झाली.

**– अशोक चिटणीस**
माजी मुख्याध्यापक,
डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे

•••

(पृष्ठ क्र. ५ वरुन - **संपादकीय)**

माणसाला खरे शिक्षण हे चार भिंतींच्या बाहेरच मिळते. त्याचे पहिले केंद्र हे 'कुटुंब' असते आणि मग त्याचा 'समाज'. आजकाल मी खरं बोलीन अशा शपथा घेऊन तो बेमालूम खोटं बोलतो. एवढेच नाही तर, असे खोट बोलल्यामुळे झालेले फायदे आणि प्रतिष्ठाही तो अनुभवत असतो. त्याचाच प्रभाव त्याच्या संपूर्ण आयुष्यावर पडतो.

आपल्या 'चरित्रा'मधून आपले 'चारित्र्य' घडत असते. चांगल्या संस्कारांचे आणि मूल्यांचे संक्रमण लहानपणीच व्हावे लागते. घरापासून दारापर्यंत असे 'आदर्शा'चे स्रोत आज आपण हरवले आहेत. समाजकारणापासून राजकारणापर्यंत मूल्यहीन पण प्रचंड यशस्वीतांच्या गर्दीमध्ये आदर्श शोधणे हे जवळ जवळ अशक्यप्राय झाले आहे.

नीरव मोदी काय, भ्रष्ट नोकरशहा काय, पतन झालेले न्यायाधीश काय, आणि सर्व विधिनिषेध बासनात बांधून ठेवणारे राजकारणी काय, ही या रोगाची 'लक्षणं' आहेत. मूळ 'रोग' हा मूल्य हरवलेले शिक्षण, आणि त्यामुळे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रामध्ये आलेली नेतृत्वाची दिवाळखोरी आहे. ही सगळी मंडळी शिक्षित किंवा उच्चशिक्षित आहेत. अशिक्षितपणा, किंवा गरीबी हे त्यांच्या पतनाचे कारण नाही. याचा सर्वात वाईट परिणाम हा बहुसंख्य समाजावर होतो, तो वैफल्यग्रस्त होतो आणि या वैफल्यातूनच आत्महत्या, गुन्हेगारी आणि अपघात वाढत असतात. जिथपर्यंत आपण हा सामाजिक रोग ओळखून 'चारित्र्य' घडवणारे शिक्षण देणार नाही, तिथपर्यंत असे नीरव मोदी वरचेवर निर्माण होत राहतील.

पण लक्षात कोण घेतो!!!

**- डॉ. विजय बेडेकर**

•••

सर्व गोष्टींपासून पश्चात्ताप होतो, पण मौन पाळण्याचा पश्चात्ताप होत नाही. – मिनँडर

# भेट एका तंत्रनिकेतन संस्थेला

ब्राझिल मधील फंडासाव लिबरॅटो नावाच्या तंत्रनिकेतन संस्थेला दिलेल्या भेटीचा वृत्तांत– *संपादक*

मागील महिन्याच्या दिशा मासिकात ब्राझील देशात भरलेल्या बत्तीसाव्या मोस्ट्राटेक (32nd MOSTATEC) स्पर्धेची माहिती दिली होती. या स्पर्धेचे आयोजन नोव्हो हॅम्बुर्गो (Novo Hamburgo) शहरात असलेल्या फंडासाव लिबरॅटो (Fundasao Liberato) नावाच्या तंत्रनिकेतन संस्थेने केले होते. तंत्रशिक्षण देणारी ही ब्राझील मधील प्रसिद्ध अशी संस्था आहे. स्पर्धेचे आयोजन शहरात असलेल्या प्रदर्शनस्थळी करण्यात आले होते. त्यामुळे ही संस्था पाहण्याची आपल्याला संधी मिळत नाही. त्यामुळे जागतिक स्तरावर एव्हढी मोठी स्पर्धा आयोजित करणारी ही संस्था कुठे आणि कशी असावी याचे कुतूहल स्पर्धेत भाग घेण्याऱ्या प्रत्येकालाच असते. ही संधी आयोजकांनी आम्हाला स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी उपलब्ध करून दिली. त्यासाठी राहत्या ठिकाणापासून संस्थेच्या प्रवेशद्वारापर्यंत वाहनाची सोय देखील संस्थेने केली होती. आम्हाला संस्था पाहण्याची उत्सुकता असल्याने आम्ही वेळेच्या आधीच हजर झालो. ठरलेल्या वेळेला हॉटेलमधून बस निघाली. आमचे हॉटेल कॅम्पो बोम (Campo Bom) नावाच्या उपनगरात होते. हा परिसर नव्याने वसविलेला आहे. त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुंदर इमारती आहेत. त्यांच्या भिंतींवर आकर्षक अशी चित्रे काढलेली आहेत.

कॅम्बो बोम उपनगरातून आमची बस थोड्याच अवधीत नोव्हो हॅम्बुर्गो शहरात आली. हे शहर सपाट जमिनीवर नसून उंचसखल भागात वसलेले आहे. रोज आमचा प्रवास हॉटेल ते प्रदर्शन स्थळ असाच असायचा. त्यामुळे शहर कसे आहे आहे याची आम्हाला पुरेशी कल्पना आलेली नव्हती. या निमित्ताने शहर पाहण्याची संधी आम्हाला मिळली. शहर लहान आणि रस्ते मोठे असल्याने वाहतुकीची कोंडी झालेली आम्हाला कुठेही पाहायला मिळाली नाही. लवकरच आम्ही शहर पार करून शहराच्या वेशीवर पोहोचलो. त्यावेळेस आमच्या बसने मुख्य रस्ता सोडला आणि डोंगरावर जाणारा एक वळणावळणाचा रस्ता घेतला. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला टूमदार असे बंगले होते. सर्वत्र स्वच्छता होती. टेकडीवरून शहर सुंदर दिसत होते. हे पाहण्यात आम्ही एवढे दंग झालो होतो की आमची बस कधी टेकडीवर पोहोचली तेच आम्हाला कळले नाही. बस थांबल्यावर



भिंतीवरील आकर्षक चित्र




संस्थेचे प्रवेशद्वार

जितके जास्त आपण जगतो, तितक्या जास्त विचित्र गोष्टी नजरेस पडतात. – जॉन रे

पाहतो तर काय आम्ही तंत्रनिकेतन संथेच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचलो होतो.

प्रवेशद्वारातून आत गेल्यावर लक्षात आले की टेकडीचा वरचा संपूर्ण सपाट भाग याच संस्थेने व्यापलेला आहे. परदेशी पाहुणे येणार म्हणून संस्थेत जय्यत तयारी केली होती. आमची पहिली भेट बंदिस्त मैदानाला (Covered Stadium) होती. फूटबॉल हा ब्राझीलचा राष्ट्रीय खेळ आहे. या खेळाला सर्वच शिक्षण संस्थांमधून महत्त्व दिले जाते. त्याचा सराव वर्षाच्या कोणत्याही कालावधीत करता यावा यासाठी देशात अनेक बंदिस्त पटांगणे उभारली आहेत. त्यातील एक या संस्थेत आहे. पटांगण फारच मोठे होते. हा खेळ प्रेक्षकांना पाहता यावा यासाठी गॅलरीची देखील सोय केलेली आहे. आम्ही पोहोचलो तेव्हा तेथील स्वयंसेवकानी आम्हाला खेळात सहाभागी व्हायचे आहे काय असे विचारले. आम्ही जेव्हा नकार दिला तेव्हा त्यानी आम्हाला खेळाचा आस्वाद घेण्यासाठी गॅलरीत नेऊन बसविले.




बंदिस्त पटांगण

माझ्या सोबत असलेले विद्यार्थी मेकॅनिकल इंजिनिअरिंग (Mechanical Engineering) या विषयाचा अभ्यास करणारे होते. त्यामुळे त्यांनी त्या विभागाला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. शोधत शोधत आम्ही योग्य त्या विभागात पोहोचलो. तेथे एक प्राध्यापक होते. आमच्या येण्याचे प्रयोजन आम्ही त्यांना सांगितले. त्यांनी आम्हाला संपूर्ण विभाग फिरवून तेथील सुविधांची माहिती दिली. या विभागात अनेक प्रकारची यंत्रे आहेत. काहीतर खूपच जुनी आहेत. त्यातील बहुतेक यंत्रे युरोपातून आयात केलेली होती. प्रत्येक यंत्र योग्य स्थितीत ठेवलेले होते. त्यांची नियमित देखभाल करीत असावेत असे दिसते.



यंत्राची माहिती देताना एक प्राध्यापक

मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून बाहेर पडून आम्ही इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग (Electrical Engineering) या विभागात गेलो. तेथे माहिती देण्यासाठी काहीजण उपस्थित होते. त्यांनी या विभागात काय शिकवले जाते याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की येथे येणाऱ्या विद्यार्थ्याला प्रथम या क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या साहित्यांची माहिती देण्यात येते. त्यानंतर त्यांना अगदी साध्या सर्किटची माहिती देतात. येथे प्रात्यक्षिकांवर भर दिला जातो. त्यासाठीच सुसज्ज अशा प्रयोगशाळा त्यांनी उभारलेल्या आहेत.



इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागातील आंतरक्रिया

इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागातून बाहेर पडेपर्यंत दुपार झाली होती. आमची हॉटेलला परत जाण्याची वेळ होत आली होती. त्यामुळे बघण्यासारखे बरेच काही असूनदेखील आम्ही संस्थेतून काढता पाय घेतला. तरीही आमची नजर केमिकल इंजिनिअरिंग (Chemical Engineering) विभागाकडे गेली. म्हणून तिथे डोकावून यायचे आम्ही ठरविले. आम्ही तेथे पोहोचलो तर एक माणूस आम्हाला दारातच भेटला. त्याने आम्हाला सांगितले की तो या तंत्रनिकेतनचा माजी विद्यार्थी आहे. त्यांनी या संस्थेत जे काही ज्ञान घेतले त्याचा त्याला जीवनात खूप उपयोग झाला. या संथेतून बाहेर पडल्यावर त्याने एका रासायनिक कंपनीत काम केले. सध्या तो फिल्म इंडस्ट्रीमध्ये काम करतो. एका दशकापूर्वी तो या संस्थेतून बाहेर पडला. तरीही त्याला या संस्थेबद्दल अजूनही आस्था आहे. त्याने आम्हाला सांगितले की, काही आंतरराष्ट्रीय पाहुणे संस्थेला भेट द्यायला येणार आहेत असे त्याला कळले. म्हणून तो आठवणीने तेथे आला. त्याच्याशी बातचीत करून आम्हाला संस्थेच्या कार्याची चांगलीच माहिती मिळाली. म्हणून आम्ही त्याच्याबरोबर एक छायाचित्र काढून घेतले.



**संस्थेच्या माजी विद्यार्थ्यासोबत घेतलेले छायाचित्र**

फंडासाव लिबरॅटो ही नोव्हू हॅम्बुर्गो शहरातील एका खाजगी शिक्षण संस्थेने चालविलेली तंत्रनिकेतन संस्था आहे. शिक्षणाचा प्रसार सर्वत्र व्हावा यासाठी सरकारने खाजगी शिक्षणाला प्रोत्साहन दिले. या संस्थेने नुकतीच ५० वर्षे पूर्ण केली आहेत. मागच्याच वर्षी त्यांनी सुवर्ण महोत्सव (Golden Jubilee) साजरा केला होता. त्याहीपेक्षा महत्त्वाचे असे की, या संस्थेने अनेक कर्तबगार अभियंते तयार केले आहेत. त्यांनी देशाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचला आहे. मोस्ट्राटेक स्पर्धा हा त्यांचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. सुरुवातीला त्यांनी तो आपल्या संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केला होता. परंतु कालांतराने त्याला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. या स्पर्धेच्या आयोजनासाठी त्यांना बराच मोठा आर्थिक बोजा उचलावा लागतो. त्यासाठी, ते शासन, निमशासकीय आणि खाजगी संस्थांकडून देणग्या मिळवतात. संस्थेचे नाव चांगले असल्याने त्यांना आर्थिक मदत मिळते. ही संस्था जवळून पाहण्याची आम्हाला संधी मिळाली हे मी आमचे भाग्य समजतो.




**संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष**

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

•••

# आरोग्यवेध-०६ आरोग्य व स्वस्थता ह्यांचे निकष

आरोग्य व स्वस्थता ह्यांचे निकष या लेखात विशद केले आहेत – *संपादक*

आरोग्य म्हणजे मनुष्याची निरोगी, अ–विकृत, प्राकृत अवस्था. प्रकृती. कुपोषण, अतिसेवन, अजीर्ण, जंतूसंसर्ग, विकार, रोग, अपघात ह्यांमुळे आरोग्य धोक्यात येते. हीच विकृत अवस्था. विकृती.

प्रकृती सुदृढ असेल तर स्वस्थता आपसुकच येते. सुदृढ मनुष्य स्वस्थतेच्या निरनिराळ्या स्तरांवर राहू शकतो. निकोप जीवन जगू शकतो. मात्र असामान्य संकटास सामोरे जाण्याची त्याची प्रतिबंधात्मक आणि निवारणात्मक शक्ती स्वस्थतेवर ठरते आणि स्वस्थता म्हणजे शारीरिकदृष्ट्या मनुष्याची कर्तबक्षमता, कार्यक्षमता, अन्नाचा ऊर्जेसाठी आणि ऊर्जेचा कामाकरता सक्षम वापर करण्याचे सामर्थ्य.

आरोग्यवान माणूस इष्टताप, इष्टचाप, सुडौल, नियमित–उदर आणि संवेदनक्षम असतो. म्हणजे त्याच्या शरीराचे तापमान इष्ट तेच असते, त्याचा रक्तचाप (रक्तदाब) इष्ट तेवढाच असतो, बांधा डौलदार असतो, उदर नियमित असते आणि परिसरातील चराचरांची योग्य ती दखल घेण्याकरता तो पुरेसा संवेदनाशीलही असतो. आता या शब्दांचा नेमका अर्थ काय आहे ते पाहू या.

**आरोग्याचे निकष**

१. तापमान : सामान्यपणे माणसाचे शरीर ३७° सेल्शस किंवा ९८.६° फॅरनहीट तापमानावर असते. ताप जास्त वाढू देऊ नये. १०२° फॅरनहीटच्या वर गेल्यास पट्ट्या ठेवाव्या. १०४° फॅरनहीटच्या वर गेल्यास त्वरित वैद्यकीय मदत मिळवावी.

२. रक्तदाब : सामान्यतः १२०/८० असतो. म्हणजे हृदय शुद्ध रक्त शरीरात ढकलते त्यावेळी जो दाब वापरते तो दाब वातावरणीय दाबाच्या संदर्भात, १२० मिलीमीटर पाऱ्याच्या स्तंभाइतका असतो, तर अशुद्ध रक्त शरीरातून खेचून घेते तेव्हा तो दाब ८० मिलीमीटर पाऱ्याच्या स्तंभाइतका कमी होत असतो. हृदयस्नायू आपल्या आकुंचन आणि प्रसरण पावण्यातून हा दाब निर्माण करत असतो. हृदयस्नायू वयपरत्वे अशक्त होत होत जेव्हा इतका क्षीण होतो की, त्याला शरीरभर रक्त पोहोचवण्यास आवश्यक तितका दाब निर्माण करता येऊ नये, तेव्हा स्वाभाविकपणेच माणसाचा मृत्यू होत असतो. नियमित प्राणायाम, दीर्घ श्वसन, व्यायाम, पौष्टिक अन्नसेवन ह्यांद्वारे हृदयस्नायूंची ताकद वाढविली जाऊ शकते. त्यामुळे शरीर अधिक आयुष्य देण्यास सिद्ध होऊ शकत असते. म्हणून प्रत्येकाने नेहमीच आपला हृदयस्नायू बळकट करण्याचा भरकस प्रयास करतच राहिले पाहिजे.

३. शरीर–वस्तूमान निर्देशांक : माणसाच्या किलोग्रॅममधील वजनास, त्याच्या मीटरमध्ये व्यक्त केलेल्या उंचीच्या वर्गाने भागल्यावर येणारे गुणोत्तर. हे सामान्यत: १९ ते २४ असते. त्याहून कमी असल्यास माणूस कुपोषित सदरात मोडेल तर त्याहून जास्त असल्यास माणूस स्थूल स्तरात मोडेल.

४. कमर/नितंब गुणोत्तर : हे सामान्यत: ०.८५ च्या आसपास असते. ते १ हून जास्त असेल तर पोट

सुटलेले असल्याचे दर्शवते. हे गुणोत्तर फारच कमी असल्यास कुपोषणाने पोट खपाटीला गेल्याचे दर्शवते.

५. संवेदनाक्षम : कुठल्याही उपाधी, व्याधी, विकार, विकृती, आजार, रोग यांनी संत्रस्त झालेला मनुष्य आजूबाजूच्या चराचराची पुरेशी दखल घेऊ शकत नाही. त्याला जर त्यांची पुरेशी दखल घेता येत असेल तर तो आरोग्यवान असण्याची शक्यता असते.

**स्वस्थतेचे निकष**

१. विश्रांत अवस्थेतला हृदयस्पंदनदर : आरामात विश्रांत अवस्थेत असतानाचा हृदयस्पंदनदर कमीतकमी असावा. पुरुषांत ७२ तर स्त्रियांत ८४ स्पंदने प्रतिमिनीट असा दर सामान्यत: असतो. विश्रांत अवस्थेतला हृदयस्पंदनदर कमीतकमी असणे चांगले.

२. कष्टानंतर ते थांबवताच लवकरात लवकर विश्रांत अवस्थेतला हृदयस्पंदनदर गाठण्याची क्षमता : काम केल्यावर अथवा व्यायामानंतर हृदयस्पंदनदर वाढतो. काम करणे थांबवताच अथवा व्यायाम बंद करताच तो पूर्वपदावरही येऊ लागतो. काम वा व्यायामाची तीव्रता, वेग अथवा ते करत राहण्याचा वेळ वाढतो तसतसा, जास्तीत जास्त हृदयस्पंदनदर गाठला जातो. (२२५ - तुमचे वय) = अंतिम हृदयस्पंदनदर. काम वा व्यायामाची तीव्रता, गती वा अवधी एवढाच वाढवावा ज्यामुळे तुमचा हृदयस्पंदनदर, तुमच्या अंतिम हृदयस्पंदनदराच्या ९० टक्क्यांहून जास्त वाढणार नाही. मात्र त्या काम वा व्यायामादरम्यानचा सर्वोच्च हृदयस्पंदनदर गाठल्यावर, काम वा व्यायाम थांबवताच, कमीत कमी किती काळात तुमचा हृदयस्पंदनदर आरामात विश्रांत अवस्थेत असतानाच्या हृदयस्पंदनदरापर्यंत परततो, तो काळ. तो कमी असावा. तो काळ जेवढा कमी तेवढेच तुम्ही जास्त स्वस्थ. म्हणजेच, कष्टानंतर ते थांबवताच लवकरात लवकर विश्रांत अवस्थेतला हृदयस्पंदनदर गाठण्याची क्षमता.

३. अंतिम हृदयस्पंदनदरावर पोहोचेपर्यंत करू शकाल ते जास्तीत जास्त काम : जास्त तीव्रतेचे, जास्तीत जास्त वेगाने, जास्तीत जास्त वेळ केलेले सोसेल तेवढे काम वा व्यायाम. ते जास्त असावे. जेवढे तीव्र, गतीमान आणि दीर्घकाळ काम करू शकत असाल, तेवढीच तुमची स्वस्थता चांगली. म्हणजेच, अंतिम हृदयस्पंदनदरावर पोहोचेपर्यंत करू शकाल ते जास्तीत जास्त तीव्रतेचे, जास्तीत जास्त गतीमान व जास्तीत जास्त काळ केलेले काम.

४. श्वसनक्षमता : पूर्ण श्वास छातीत भरून घेऊन स्तनाग्रांपाशी मोजलेला छातीचा घेर, उणा त्याच जागी मोजलेला संपूर्ण निश्वसनाचे वेळी छाती रिकामी असता मोजलेला घेर हा फरक, रिकाम्या छातीच्या घेराच्या टक्केवारीत व्यक्त केल्यास मिळणारा आकडा म्हणजे श्वसनक्षमता. ही ऑलिंपिक्सपटूंसाठी १५ टक्के पर्यंत असते. तर हृदयरुग्णांची ती २.५ टक्क्यांपर्यंत खालावलेली असते. सामान्य माणसाची श्वसनक्षमता ५ ते १० टक्के असू शकते. प्राणायामाने, योगासने केल्याने वा व्यायामानेही ती वाढते. हे सारे करताना त्याचा उद्देश श्वसनक्षमता वाढवण्याचाच असावा. थोड्या थोड्या कालावधीनंतर पुन्हा मोजून प्रगतीची खात्री करून घ्यावी.

५. श्वसनगती : श्वास आणि उच्छ्वास यांचे एक

आवर्तन असते. एका आवर्तनास लागणारा वेळ श्वसनगती ठरवतो. श्वसनगती वेगवती असणे अस्वस्थतेचे निदर्शक असते. सामान्य माणूस मिनिटास १० ते १५ आवर्तने या गतीने श्वासोच्छ्वास करतो. तर ऋषीमुनी मिनिटास ५-६ आवर्तने या गतीने श्वासोच्छ्वास करत असतात. जर आयुष्याचे श्वास पूर्वनिर्धारित असतील तर दीर्घ श्वसन/ मंद श्वसन दीर्घायुष्याप्रत नेत असणार ह्यात काय संशय!

यानुसार मापने करून आपापली व्यक्तीगत अवस्था नोंदवणे गरजेचे असते. म्हणजे मग भविष्यात पुन्हा केलेल्या त्याच निकषांच्या मापनाने, आपण पूर्वस्थितीपेक्षा उन्नत होत आहोत की अवनत, त्याचा अंदाज येतो. सुधारणेची गरज जाणवते. सुधारणेची दिशा कळते. तसेच त्यापश्चात केलेल्या भावी मापनांत, सुधारणेकरता केलेल्या प्रयत्नांचे यश स्पष्टपणे दिसू शकते.

म्हणूनच, आपल्या शरीराचे तापमान, रक्तचाप, शरीर-वस्तूमान निर्देषांक, कमर/नितंब गुणोत्तर आणि संवेदनाक्षमता यांबाबतची आपापली निरीक्षणे आजच नोंद करून ठेवा. तीन महिन्यांनी ती पुन्हा मोजा. पाहा नेमका काय फरक पडला आहे. सुधार होत असेल तर तुमची जीवनशैली योग्य आहे. बिघाड होत असेल तर ती सुधारणे आवश्यक ठरेल.

विश्रांत अवस्थेतला हृदयस्पंदनदर, कष्टानंतर ते थांबवताच लवकरात लवकर विश्रांत अवस्थेतला हृदयस्पंदनदर गाठण्याची क्षमता, अंतिम हृदयस्पंदनदरावर पोहोचेपर्यंत करू शकाल ते जास्तीत जास्त काम, श्वसनक्षमता आणि श्वसनगती यांचीही मापने नोंद करून ठेवा.

दररोज न चुकता एक ते दोन तास वेगाने चालले तरी निरोगी, स्वस्थ जीवन जगण्यास ते पुरेसे असते. सामान्य चालीने मनुष्य तासात सुमारे ४ किलोमीटर चालतो. तासाला ६ किलोमीटर चालला, किंवा पळाला तर त्यास जलद चालणे (ब्रिस्क वॉक) म्हणतात. चालणे आणि धावणे ह्यात नेमका फरक काय आहे? ज्या क्रियेत किमान एक तरी पाऊल जमिनीस चिकटलेले राहते त्यास चालणे म्हणतात. म्हणजे उचललेले पाऊल जमिनीवर टेकल्याखेरीज, जमिनीवर असलेले दुसरे पाऊल उचलायचे नाही. धावण्याच्या क्रियेत मात्र जरी आलटून पालटून दोन्ही पावले तशाच चक्रनेमीक्रमाने समोर समोर टाकली जात असली तरी, दरम्यानचा काही काळ दोन्हीही पावले जमिनीच्या वर उचललेली असतात. मग एकाच वेगाने चालणे आणि पळणे शक्य आहे का? हो. किंबहुना चालण्याचा वेग पळण्याहून अधिकही राहू शकतो.

उपजीविकेच्या पाठीमागे धावपळ करणारा माणूस दिवसभरात स्वाभाविकतः हातापायांची एवढी प्रचंड हालचाल करत असतो की त्यास कृत्रिम व्यायामाची आवश्यकताच पडू नये. मात्र हल्लीची जीवनशैली एवढी कृत्रिम झाली आहे की, किमान शरीरसंचालनासाठी तरी व्यायाम, प्राणायाम आवर्जून करण्याची गरज भासते. कारण, दिवसातला खूप वेळ आपण खुर्चीत बसून, उभेच्याउभे राहून, दीर्घकाळ प्रतिक्षेत राहून वेचत असतो. ह्या काळात शरीरात ताण जमा होतात आणि ते लवचिकता गमावत जात असते. म्हणूनच वेगळ्याने व्यायाम करण्याची गरज असते. शरीरास, सूर्यनमस्कारासारखा व्यायाम नाही. रोज जमतील तितके सूर्यनमस्कार शास्त्रशुद्ध पद्धतीने घातले तर निरोगी, स्वस्थ आयुष्य दीर्घकाळ जगण्याची बेगमी होऊ शकते.

त्याहीपेक्षा मूलभूत उपाय म्हणजे आपली भारतीय अष्टांगयोग जीवनशैली आचरणात आणणे. पतंजली मुनींनी सूत्रबद्ध केलेला योग म्हणजेच अष्टांगयोग. योगाचार्य कृष्णाजी केशव कोल्हटकर ह्यांनी, पातंजल

योगसूत्रांचे वर्णन भारतीय मानसशास्त्र असेच केले आहे. अष्टांगयोगात कैवल्य म्हणजेच मोक्षप्राप्तीचा मार्ग; यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी ह्या टप्प्यांनी प्रगत होतो; असे सांगितलेले आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रह्मचर्य हे पाच यम आहेत. शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान हे पाच नियम आहेत. दैनंदिन जीवनात यम-नियमांचे पालन करणे, अष्टांगयोगाचा महत्त्वाचा भाग आहे. अशाप्रकारे व्रतस्थ जीवन जगत असता करावयाच्या आसनांनाच हल्ली 'योग' असे संबोधले जात असल्याने त्यांचे वर्णन इथे वेगळ्याने करण्याची आवश्यकता नाही.

मात्र इथे एवढेच नमूद करायला हवे की, योगासने ही सावकाशपणे, शरीरास कुठेही त्रास न होता, पण शरीराची प्रत्येक स्वायत्तता हळूहळू विकास पावत राहावी अशा प्रेरणेने करायला हवीत. योगासनाच्या अंतिम स्थितीत सहा मिनिटे टिकून राहता यायला हवे. सुमारे तासभर कुठलाही व्यायाम केल्याने रक्तदाब सुमारे १० मिलिमीटर पाऱ्याइतक्या प्रमाणात वाढत असतो, तर कुठलीही योगासने सुमारे तासभर केली असता रक्तदाब सुमारे १० मिलिमीटर पाऱ्याइतक्या प्रमाणात कमी होत असतो, असे प्रत्यक्षात आढळून आलेले आहे. आसनांचा उद्देश, समाधीसाधनार्थ एकाग्रता प्राप्तीसाठी, शरीर संपूर्ण शिथील करून, इष्ट ते आसन दीर्घकाळ टिकवून धरण्याची क्षमता प्रस्थापित करण्याचा असायला हवा.

अशी क्षमता प्रस्थापित झाल्यावर, मग श्वासनियंत्रण शिकून घेण्यासाठी प्राणायामाची आवश्यकता असते. पतंजली मुनींच्या सूत्रांनुसार पूरक, कुंभक आणि रेचक अशा श्वसन अवस्थांवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य मिळवणे हा प्राणायामाचा उद्देश असायला हवा. परिसरात सहज सामावून जायचे असेल तर, कुठलेही काम करत असता श्वास-प्रच्छवास संथ आणि नियमितपणे होत राहायला हवा. तरच प्रत्याहारास योग्य अशी पोषक अवस्था निर्माण होऊ शकते.

अशी अवस्था निर्माण झाल्यावर, धनुष्यास प्रत्यंचा लावून, बाण सोडण्यापूर्वी जसा प्रत्यंचेत धरून, तो खेचून घेत असतात, तशी एकतानता आणि अचूक नेम साधण्याची प्रक्रिया, म्हणजेच प्रत्याहार. ह्याचाच व्यावहारिक अर्थ 'स्वस्थचित्त होणे, दत्तचित्त होणे आणि सावधचित्त होणे' असा होतो.

ह्या प्रक्रियेत ज्या विषयावर ध्यान करायचे आहे, त्यावर नेम धरायचा असतो. त्या विषयाची निश्चिती म्हणजेच 'धारणा' होय. प्रत्येक व्यक्तीस स्वतःपुरते कार्यक्षेत्र नक्की झाले म्हणजे त्याची धारणा पक्की झाली असे म्हणता येईल.

धारणा ज्या विषयावर पक्की झालेली असेल त्या विषयावर मग मन एकाग्र करत जाण्याने 'योगः कर्मसु कौशलम्' साध्य होत असते. अशी कौशल्यप्राप्ती हाच योग होय. त्याच विषयाच्या ध्यानात मग जीव गुंतू लागतो. एकाग्रता साधत जाते. व्यक्तीस जेव्हा अशी एकाग्रता साधत असते तेव्हा समाधी लाभते, कैवल्य किंवा मोक्ष प्राप्त झाला असे म्हणता येते. प्रत्येक व्यक्तीस अशाप्रकारे मोक्षप्राप्ती झाली, तर सर्व समाजासच कैवल्यलाभ होऊन समाज स्थिरपद, सुखमय जीवन जगू शकतो. असेच ईप्सित मनाशी धरूनच अष्टांगयोगाची संहिता सिद्ध झालेली आहे.

निरामय, निरोगी जीवनात अष्टांगयोग कैवल्यप्राप्तीचा मार्ग दाखवतो. मात्र विकारवशात् मनुष्याला त्या मार्गावरून चालणे शक्य होत नाही. त्यास पुन्हा आरोग्यप्राप्ती करवून देण्यासाठी आयुर्वेद निर्माण झाला. पतंजली मुनींनी आयुर्वेदाचाही अभ्यास केला होता. मात्र अशा

(पृष्ठ क्र.३० वर)

सर्वात निरर्थक प्राणी कोण असेल, तर तो भावनाप्रधान प्राणी. - कार्लाइल

# गुप्तकालीन भारत : प्राचीन भारतातील ‘सुवर्णयुग’

**भाग : ४**

*प्राचीन काळात इसवी सनाच्या ४ थ्या व ५ व्या शतकात भारतावर राज्य करणाऱ्या सुप्रसिद्ध ‘गुप्त’ घराण्याविषयी व त्यांच्या राज्यकारभाराविषयी विस्तृत माहिती देणारा लेख - संपादक*

(लेखाचा उर्वरीत भाग मागील अंकापासून पुढे...)

गुप्त साम्राज्याचा विस्तार पूर्वेकडे बंगालच्या उपसागरापर्यंत तर पश्चिमेकडे गुजराथपर्यंत झालेला होता हे आपण पाहिलेलेच आहे. गुप्त साम्राज्य हे प्राचीन काळातील विशाल साम्राज्य होते यात काही शंकाच नाही. गुप्त सम्राटांनी हे अतिविशाल साम्राज्य जवळ जवळ अडीचशे वर्षांहून अधिक काळ सुरळीतपणे सांभाळले यावरून गुप्तांचे प्रशासन किती कार्यक्षम होते याची प्रचीती येते. आपणास गुप्त सम्राटांच्या प्रशासनाविषयीची माहिती त्यांच्याकाळातील नाण्यांवरून तसेच इतर पुरातत्वीय साधनांच्याद्वारे मिळावयास मदत होते. एकंदरीतच गुप्त साम्राज्याविषयी मोठ्या प्रमाणात माहिती मिळण्याचा अजून एक महत्त्वाचा स्रोत म्हणजे फाहीयान (Fa-hien) ह्या चिनी प्रवाशाचे लिखाण होय.

गुप्त साम्राज्याच्या प्रशासनाचा प्रमुख व कणा हा स्वतः सम्राट वा राजा होता. गुप्तकालीन शासन व प्रशासन व्यवस्थेच्या केंद्रस्थानी प्रामुख्याने गुप्त सम्राटच असे. गुप्त सम्राटांपूर्वी होऊन गेलेले शासक सहसा स्वतःस ‘राजा’ वा ‘राजन’ म्हणवून घेत असत. गुप्तांपूर्वीच्या काळातील अनेक लिखित साधनांमध्ये सुद्धा शासकाचा उल्लेख वा राज्याच्या प्रमुखाचा उल्लेख प्रामुख्याने ‘राजा’ म्हणूनच आढळतो. परंतु गुप्त सम्राटांनी ‘राजाधिराज’, ‘महाराजाधिराज’, ‘परममहाराजाधिराज’, ‘राजाधिराजश्री’, ‘राजराजाधिराज’ इत्यादी किताब घेतलेले आढळतात. यावरून गुप्तकाळात राजाला असलेले महत्त्व व त्याचे शासन व प्रशासन व्यवस्थेतील असलेले अतिमहत्त्वाचे स्थान अधोरेखीत होते. एवढेच नव्हे तर, गुप्तकाळात वर दिलेल्या पदव्यांसोबतच राजा वा सम्राट स्वतःला देवाच्या नावाची उपाधी देखील देत असे वा लावत असत असे ही बाब निदर्शनास येते. आपणास ह्याबाबतची माहिती गुप्तकालीन नाणी तसेच इतर स्तंभलेखांवरून मिळते. गुप्तकालीन स्तंभलेखांमध्ये समुद्रगुप्ताविषयी माहिती देणारा अलाहाबादचा स्तंभलेख सर्वात जास्त प्रसिद्ध आहे हे आपणास ठाऊकच आहे. अलाहाबादच्या स्तंभलेखात समुद्रगुप्ताचा उल्लेख ‘भूतलावरील देव’ अशाप्रकारे आलेला आहे असे अभ्यासक म्हणतात. गुप्तांच्या वंशावळीची माहिती देणाऱ्या इतर ऐतिहासिक साधनांमध्येसुद्धा समुद्रगुप्ताला कुबेर, वरुण, इंद्र, यम इत्यादी देवांशी समान असलेला वा त्यांच्याप्रमाणेच पराक्रम गाजवणारा पराक्रमी राजा असे म्हटले गेले आहे असे इतिहासकार म्हणतात.

काही साधनांमध्ये गुप्त सम्राटांनी ‘परमदैवत परमभट्टारक महाराजाधिराज’ असा किताब घेतलेला असल्याचे दाखलेसुद्धा आढळतात. गुप्त सम्राटांनी जरी देवांशी समानता दाखविण्याच्या आशयाचे किताब घेतलेले असल्याचे आढळत असले तरी त्यांना लोक देव मानत नसत. याचा अर्थ असा निघतो की, राजाचे स्थान देवाप्रमाणे पवित्र होते व ते देवांसारखे पराक्रमी होते वा त्यांनी देवासारखा पराक्रम गाजविणे अपेक्षित होते परंतु त्यांना देवांप्रमाणे पूजले जात नसे. उलट लोकांना राजाविषयी आदर असे व राजा आपले प्रजेविषयीचे कर्तव्य पार पाडण्यात कसर करत नसे असे म्हणणे वावगे ठरू नये. राजाला जरी शासनव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान होते व त्याच्या हातात सत्ता होती तरी

राजाला आपल्या कर्तव्याची जाण होती व एकंदरीतच समाजात असलेल्या परंपरा व रुढी तसेच चालिरिर्तीविषयी राजाला आदर होता. त्याचप्रमाणे राजाने लोकांच्या हितासाठी काम करावे याची गुप्त सम्राटांना जाणीव होती हे आपणास इतिहासाचा अभ्यास केल्यावर लक्षात येते. त्याकाळात समाजातील विद्वानांनी आखून दिलेले नियम व परंपरा ह्या राजाच्या अमर्याद सत्तेवर नियंत्रण ठेवण्याचे काम करत असत यात वाद नाही.

गुप्तकाळात राजाला न्यायव्यवस्था, लष्कर वा सैनिकी प्रशासन तसेच मूलकी प्रशासनाच्या बाबतीत खूप अधिकार होते. एकप्रकारे न्यायिक, सैनिकी व मूलकी सत्ता राजाच्या हातात एकवटलेली होती. त्यामुळेच आपण अगोदर असे म्हटले की, राजा हा शासन व ाप्रशासन व्यवस्थेच्या केंद्रस्थानी होता. असे असले तरी राजा आपल्या साम्राज्याचे प्रशासन मंत्री व इतर अधिकाऱ्यांच्या सहाय्याने चालवत असे. साम्राज्यातील सर्व प्रांताधिकारी, सैनिकी व मूलकी अधिकाऱ्यांची नेमणूक स्वतः राजा वा सम्राट करत असे. लढाया वा युद्धांमध्ये मात्र अनेकदा गुप्त सम्राट स्वतः आपल्या सैन्याचे नेतृत्व सेनापती म्हणून करत असत. याची प्रचीती आपणास समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, स्कंदगुप्त आदी गुप्त सम्राटांनी रणांगणांवर गाजविलेल्या पराक्रमावरून येते.

गुप्तकाळात वारसाहक्क पद्धतीप्रमाणे राजाच्या पश्चात राजाचा ज्येष्ठ पुत्र गादीवर येत असे वा राजा बनत असे. परंतु ह्या नियमाला वा परंपरेला काही अपवाद असल्याचे देखील आपल्या निदर्शनास येते. अनेकदा राजाने आपल्या हयातीत स्वतःच्या वारसाचे नाव जाहीर केलेले आढळते. याचे उदाहरण म्हणजे समुद्रगुप्त व दुसरा चंद्रगुप्त हे दोन गुप्त सम्राट होत. पहिल्या चंद्रगुप्ताने आपल्या मंत्रीमंडळासमोर वा अधिकाऱ्यांसमोर समुद्रगुप्तला आपला वारस जाहीर केले होते. अगदी ह्याचप्रकारे समुद्रगुप्ताने दुसऱ्या चंद्रगुप्तला स्वतःचा वारस जाहीर केले होते अशी माहिती काही अभ्यासकांकडून मिळते. अर्थात, अगोदर चर्चा केल्याप्रमाणे 'रामगुप्त प्रकरण' अनेक इतिहासकारांना मान्य नाही.

राजा वा सम्राट साम्राज्याचे प्रशासन आपल्या मंत्रीमंडळाच्या सहाय्याने चालवत असे. आपणाला 'स्मृती' साहित्य व तत्कालीन अनेक शिलालेखांमध्ये मंत्र्यांचा उल्लेख सचीव असा देखील आलेला आढळतो. राजाच्या मंत्रीमंडळात किती मंत्र्यांचा वा सचिवांचा समावेश होता वा त्यांची नेमकी संख्या किती होती याविषयीची माहिती आपणास उपलब्ध नाही. परंतु मंत्री वा सचिव धर्म, सेना, महसूल, व्यापार, शाही आस्थापना, परराष्ट्र व्यवहार इत्यादी खात्यांचा वा विभागांचा कारभार पाहात / सांभाळत असत. अर्थात, मंत्र्यांना त्यांच्या कामकाजात सम्राटाचे मार्गदर्शन तर असेच परंतु मंत्र्यांच्या कामकाजावर त्याची नजरसुद्धा असे. मंत्र्यांच्या बाबतीत येथे एक महत्त्वाची गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे व ही गोष्ट म्हणजे मंत्र्यांकडे सैनिकी कौशल्य अपेक्षित असणे असे अभिप्रेत होते. अभ्यासकांच्या मते वेळ पडल्यास मंत्र्यांना रणांगणांवर जाऊन युद्धदेखील करावे लागत असे. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास समुद्रगुप्ताचा मंत्री हरिसेन हा सैन्याच्या सेनापतीची भूमिकादेखील निभावत असे अशी माहिती काही अभ्यासक देतात. ह्याच हरिसेनाने समुद्रगुप्ताविषयी माहिती देणारा अलाहाबाद येथे सापडलेला स्तंभलेख कोरवून घेतला होता. राजाच्या मंत्रीमंडळात राजपूत्र तसेच मांडलिकत्व पत्करलेल्या राजांचा देखील समावेश असे अशी माहिती काही इतिहासकार देतात. राजा व मंत्रीमंडळातील दुवा म्हणून कंचुकी (Chamberkin) हा अधिकारी काम करत असे.

गुप्तकालीन मंत्रीमंडळाच्या बाबतीत बरीचशी आपणास प्राचीन काळातील संस्कृत भाषेतील प्रसिद्ध

लेखक व कवी कालीदास यांच्या लिखाणातून मिळते. रुबा व पृथ्वीसेन ह्या समुद्रगुप्तच्या व पहिल्या कुमारगुप्तच्या मंत्र्यांनी दोन पिढ्यांपर्यंत कामकाज पाहिल्याचे निदर्शनास येते. मंत्र्यांची नियुक्ती करताना त्यांची जात व पंथापेक्षा त्याच्या गुणवत्तेचा विचार केला जात असे. त्यामुळेच उदाहरण द्यायचे झाले तर दुसरा चंद्रगुप्त स्वतः वैष्णव असूनदेखील त्याचा एक सेनापती आम्रकरदेव हा बौद्ध होता व युद्ध आणि शांतता मंत्री सबा वीरसेन हा शैव होता. ह्यावरून गुप्त सम्राट हे खऱ्या अर्थाने सहिष्णू होते ही बाब पुन्हा एकदा अधोरेखीत होते.

गुप्त सम्राट आपले प्रशासन सुरळीत चालविण्यासाठी अनेक अधिकाऱ्यांची नियुक्ती करत असत. गुप्त सम्राटांच्या मुलकी अधिकाऱ्यांची काही पदनामे पुढीलप्रमाणे होती – राजपुरुष, राजनायक, राजपुत्र, राजअमात्य, महासामंत, महाकुमारअमात्य, महाप्रतिहार, कांचुकी, अज्ञसमारिक इत्यादी. कांचुकी ह्या अधिकाऱ्याची जबाबदारी राजाच्या राजवाड्यातील स्त्रियांच्या दालनांची/सदनिकांची काळजी घेणे ही होती. अज्ञसमारिक ह्या अधिकाऱ्याचे काम राजाचे निरोप पाठविण्याचे असे.

उपरिक, दशपराधिक, चौरोधारनिक, दंडिक दंडपशिक, गौलीमक, क्षेत्रप्राणतपाल, कोट्टपाल, अंगरक्षक आयुक्तक–विनियुक्तक, राजुक इत्यादी काही महसूल व पोलीस खात्यातील महत्त्वाची अधिकारी मंडळी होती.

गुप्तकालीन शिलालेखांवरून सेनापती, महासेनापती, बलाधिकृत, महाबलाधिकृत, दंडनायक, संधीविग्रहिक, महासंधीविग्रहिक, गोप्त हे सैनिकी अधिकारी असत अशी माहिती मिळते. त्याचप्रमाणे महादंडनायक व महाक्षपटलिक हे न्यायालयीन अधिकारी होते असे निदर्शनास येते.

गुप्त सम्राटांचे केंद्रीय सचिवालय त्यांची राजधानी पाटलीपूत्र येथे होते. केंद्रीय सचिवालयाच्या मुख्य अधिकाऱ्यास वा सामान्य अधीक्षकास ‘सर्वाध्यक्ष’ असे म्हटले जाई. केंद्रीय प्रशासनाच्या व राजाच्या आज्ञा प्रांतीय तसेच जिल्हा प्रशासन व अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम दूतांच्या व निरिक्षकांच्या माध्यमांतून केले जात असे. प्रत्येक मंत्र्यांची आपल्या खलित्यावर उमटविण्यासाठी स्वतःची मुद्रा असे व तत्सम खलिता हा त्याच मंत्र्याने वा त्याच्या कार्यालयाने पाठविलेला आहे हे प्रमाणित करण्यासाठी ती मुद्रा खलित्यावर उमटवली जात असे.

राज्याच्या रोजनिशितल्या प्रशासकीय बाबींबाबतचा कारभार मंत्री चालवित असत. परंतु एखाद्या महत्त्वाच्या कार्यालयीन वा धोरणात्मक बाबीशी निगडित विषयाची चर्चा मंत्रीमंडळात केली जात असे. मंत्रीमंडळाच्या अशाप्रकारच्या बैठकी सम्राटाच्या उपस्थितीत होत असत. काही कारणांमुळे सम्राट मंत्रीमंडळाच्या बैठकीस हजर राहू शकला नसेल तर मंत्रीमंडळाने चर्चा करून घेतलेल्या निर्णयास अंतिम अनुमती घेण्यासाठी सम्राटाकडे पाठविले जाई. सम्राटाच्या दरबारातील अजून काही महत्त्वाच्या अधिकाऱ्यांपैकी ‘प्रतिहार’ व ‘महाप्रतिहार’ हे अधिकारी होत. दरबारात पार पाडाव्या लागणाऱ्या विविध औपचारिक कार्यांचे हे दोन अधिकारी प्रमुख असत. ह्या दोन अधिकाऱ्यांना सम्राटाच्या दरबारात कुणी हजर रहावे हे ठरविण्याचा देखील अधिकार होता. एकंदरीतच शासकीय यंत्रणेत सैनिकी खात्याला फार महत्त्व दिले जात असे. असे असणेसुद्धा स्वाभाविक होते, कारण राज्याच्या सुरक्षिततेवरच आर्थिक भरभराट व इतर साऱ्या गोष्टी अवलंबून असत. कर आकारणी व महसूल गोळा करण्याची जबाबदारी महसूल विभागाच्या मंत्र्याची असे. धार्मिक खात्याचा मंत्री धार्मिकतेबाबत, धार्मिक घडामोडींबाबत व नैतिकतेबाबतच्या विषयांशी निगडित बाबींचा कारभार पाहात असे. ह्या खात्याची प्रमुख जबाबदारी सम्राटाला जरूर पडल्यास धार्मिक बाबींबाबत

मार्गदर्शन करणे, सार्वजनिक मंदिरांची देखरेख करणे, समाजात विद्वत्तपूर्ण शिक्षणाचा प्रसार करणे, मंदिरे व इतर धर्मीय प्रार्थनास्थळांना तसेच बौद्ध विहारांना व धर्मादाय संस्थांना अनुदान देणे ही होती. गुप्तकालात परराष्ट्र संबंधाविषयीचा कारभार पाहणाऱ्या मंत्र्याला महासंधीविग्रहिक (Mahasandhivigrahika) असे म्हटले जाई. हा मंत्री राजा व सैनिकी खात्याच्या सहकार्याने व सहाय्याने आपल्या खात्याचे कामकाज पार पाडत असे.

गुप्त सम्राज्याची व्याप्ती ही अतिविशाल होती हे आपण पाहिलेलेच आहे. समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, स्कंदगुप्त अशा पराक्रमी गुप्त सम्राटांनी बंगालपासून ते गुजराथपर्यंत गुप्त साम्राज्याचा विस्तार केलेला होता. अशा विशाल साम्राज्याचा राज्यकारभार हाकण्यासाठी एक सुव्यवस्थित प्रशासकीय यंत्रणा फार गरजेची होती. प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी गुप्त सम्राटांनी आपल्या प्रशासनाचे विकेंद्रीकरण केल्याचे आपल्या लक्षात येते. गुप्तकाळात साम्राज्याची विभागणी प्रांत व जिल्ह्यांमध्ये केलेली असल्याचे आपल्या निदर्शनास येते. केंद्रीय सत्ता वा प्रशासक व प्रांतीय प्रशासन यांच्यामधील दुवा म्हणजे कुमारअमात्य (Kumaramatya) व आयुक्त (Ayukta) हे अधिकारी असत. कुमारअमात्य हे अत्युच्च पदावरील प्रशासकीय अधिकारी असत. राजपूत्र, सम्राटाच्या खाजगी ताफ्यातील वा सेवेतील अधिकारी तसेच जिल्हा पातळीवरील अतिमहत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या वर्गाचा उल्लेखदेखील कुमारअमात्य असा आलेला असल्याचे आपणास आढळते. कुमारअमात्य हे अधिकारी म्हणजे आताच्या आधुनिक काळातील सनदी अधिकारी वा नोकरशहांप्रमाणे आपली कर्तव्ये पार पाडत असत असे म्हणणे वावगे ठरू नये. असे निदर्शनास आले आहे की, कुमारअमात्य ह्या श्रेणीतील अधिकारी अनेकदा जिल्हा, प्रांत व केंद्रीय सचिवालय इत्यादी पातळींवर देखील कार्यरत असत. राजाने युद्धात वा इतर मार्गाने जिंकलेली संपत्ती पुनर्संचयित करणे ही 'आयुक्त' ह्या अधिकाऱ्यांची जबाबदारी असे. काही वेळा आयुक्तांना जिल्हा वा एखाद्या मोठ्या महानगराचे प्रशासन सांभाळण्याची जबाबदारी दिली जात असे.

गुप्तकाळात प्रांतांना 'भूक्ती' वा 'देश' असे म्हटले जाई. भूक्ती वा देशांची विभागणी 'विषयांमध्ये' केली जात असे. त्याकाळात जिल्ह्याला 'विषय' असे म्हटले जात असे. विषयांची वा जिल्ह्यांची विभागणी ग्रामांमध्ये म्हणजेच गावांमध्ये केलेली असे. 'भूक्ती' वा प्रांताच्या प्रशासकीय प्रमुखास 'उपरिक' (Uparika) असे म्हटले जाई. 'उपरिक' ह्या प्रांताधिकाऱ्याची नियुक्ती सम्राट करत असे व ह्या अधिकाऱ्याने सम्राटाला बांधिल राहणे व प्रांताच्या कारभाराविषयीची इत्यंभूत माहिती सम्राटाला देणे आवश्यक होते. असे लक्षात येते की, काही वेळा प्रांतामध्ये 'उपरिक' वा प्रांताधिकारी म्हणून राजपुत्रांची नियुक्ती केली जात असे. प्रांताधिकाऱ्याचे पद राजपुत्र भूषवित असेल तर त्यास 'उपरिक-महाराज' असे संबोधले जाई. उपरिकांना आपल्या प्रांतातील कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार असत. त्याचप्रमाणे लोककल्याणकारी बाबींबाबत वा योजनांसंबंधांत त्यांना काम करण्याची मुभा होती. अर्थात, प्रांतधिकाऱ्यांवर सम्राटाचे नियंत्रण असे.

विषयांचे म्हणजेच जिल्ह्यांचे प्रशासन सांभाळण्याची जबाबदारी 'विषयपती' ह्या अधिकाऱ्यांची असे. विषयपतींची नियुक्ती साधारणतः कुमारअमात्य वा आयुक्त नामक अधिकारी करत असत. विषयपतीला त्याच्या प्रशासनाच्या कामात व्यापारी संघाचे अध्यक्ष, मुख्य लेखक (यांना लिपीक वा कारकून म्हणण्यास हरकत नसावी) तसेच स्थानिय पातळीवरील इतर महत्त्वाच्या व्यक्तींची मदत होत असे. जिल्हा पातळीवरील प्रशासन सुरळीतपणे चालविण्यासाठी एक परिषद असे. ह्या परिषदेस 'विषयमहात्तर' (Vishayamahattara) असे म्हटले जाई. अशा तऱ्हेने

अगोदर नमूद केल्याप्रमाणे गुप्तकाळात प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी शक्य असेल तेथे प्रशासनाच्या विकेंद्रीकरणाचे तत्त्व वापरले जाई.

गुप्त सम्राटांना याची पूर्ण कल्पना होती की, केंद्रीय सत्तेने वा राजाने घेतलेले निर्णय व धोरणांची अंमलबजावणी गावपातळीपर्यंत अत्यंत सुलभतेने झाली पाहिजे. जोपर्यंत केंद्रीय सत्तेचे निर्णय व धोरणं गावपातळीपर्यंत पोहोचत नाहीत तोपर्यंत तत्सम प्रशासन कार्यक्षम आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे गुप्तकाळात ग्राम वा गावपातळीवर देखील प्रशासन यंत्रणा स्थापन केलेली आपणास आढळते. ग्रामपातळीवरील प्रशासन यंत्रणेच्या प्रमुखास त्याकाळात 'ग्रामाध्यक्ष' असे म्हटले जाई. ग्रामाध्यक्षाला त्याच्या स्थानिक प्रशासकीय कार्यात एक गैर अधिकृत (non-official) परिषद मदत करत असे. ह्या गैर अधिकृत परिषदेला मध्य भारतातील प्रदेशांमध्ये 'पंचमडली' तर बिहारकडच्या प्रदेशांमध्ये 'ग्रामजनपद' असे संबोधले जात असे. ग्राम पातळीवरील परिषदेची मुख्य जबाबदाऱ्या व कार्ये गावचे संरक्षण, ग्राम वा स्थानिक पातळीवरील तंटे सोडविणे, लोकोपयोगी उपक्रम राबविणे, गावकऱ्यांकडून ग्राम पातळीवरील विविध कर गोळा करणे व तो कररुपी महसूल केंद्रीय कोषागारात जमा करणे ही होती.

प्राचीनकाळातील इसवीसना पूर्वीच्या काळात भारतात मौर्य राजघराण्याची सत्ता होती व त्यांनीसुद्धा आपल्या साम्राज्याची मुहूर्तमेढ मगधपासूनच केली होती. मौर्य राजघराण्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य हा होता. चंद्रगुप्त मौर्याला कौटील्य ऊर्फ चाणक्याच्या रूपाने द्रष्टा गुरू व मार्गदर्शक लाभला होता. आजही विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी व यशस्वी लोक कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील दाखले देताना आढळतात. एवढेच काय, अगदी व्यवस्थापन शास्त्रातदेखील कौटिल्याच्या अनेक वचनांचा सद्दस्थितीत अनेक लोक गांभीर्याने अभ्यास करताना निदर्शनास येते. त्याचप्रमाणे व्यवस्थापन क्षेत्रातील मंडळी कौटिल्याची तत्त्वे आपल्या रोजच्या व्यवस्थापनात व कार्यशैलीत अंगीकारताना आढळतात. असो. गुप्त व मौर्य ह्या दोन घराण्यांमधील महत्त्वाचे साम्य म्हणजे ही दोन्ही राजघराणी मुळात मगधवर राज्य करत होती व कालांतराने त्यांनी आपापल्या साम्राज्याचा भारताच्या विविध भागांत विस्तार केला. तसेच ह्या दोन्ही राजघराण्यांच्या राजधानीचे शहर पाटलीपुत्र हे होते. प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासकांचे असे म्हणणे आहे की, गुप्तांचे शहरी वा नागरी भागातील प्रशासनाचे स्वरूप मौर्यकालीन जी प्रशासन व्यवस्था होती जवळपास त्याचप्रमाणे होते. शहराच्या वा नगराच्या प्रशासनाच्या प्रमुखास गुप्तकाळात 'पुरपाल'(Purapala) वा 'नगररक्षक' (Nagar Rakshak) असे म्हटले जात असे. 'पुरपाल' वा 'नगररक्षक' ह्या अधिकाऱ्याची तुलना साधारणपणे आजच्या काळातील 'महापौर' ह्या पदाशी करता येईल. आपणास ठाऊकच आहे की, महापौरास आपण शहराच्या प्रथम नागरिकाचा सन्मान देतो व हा लोकांनी निवडून दिलेला प्रतिनिधी असतो. गुप्तकाळात 'नगररक्षकाला' सध्याच्या काळातील महापौराप्रमाणे मान-सन्मान तसेच अधिकार असावेत असा अंदाज बांधणे सयुक्तिक ठरेल. शहर पातळीवरील 'पुरपाल' वा 'नगररक्षक' ह्या अधिकाऱ्यांवर देखरेख ठेवण्यासाठी एका उच्च अधिकाऱ्याची नेमणूक केली जात असे व या अधिकाऱ्यास 'पुरपाल-उपरिक' (Purpala Uparika) असे म्हटले जाई. प्रत्येक नगरासाठी एक नगर परिषद असे व शहरांच्या वा नगरांच्या प्रशासनामध्ये स्थानिय पातळीवरील व्यावसायिक संघांना व इतर संस्थांना महत्त्व दिले जात असे. त्याचप्रमाणे कलावंत, व्यापारी व लेखक मंडळींनादेखील स्थानिक पातळीवर मानाचे स्थान होते. कलावंत व वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधींचे वेगळे संघ असत. माळव्यातील मँडसोर (Mandasor) तसेच इंदोर (Indore) येथे रेशमी विणकरांचे संघ अस्तित्त्वात

असल्याचे निदर्शनास येते. काही अभ्यासक असेही म्हणतात की, पश्चिम उत्तर प्रदेशातील बुलंद शहरात तेल गाळण्याचे काम करणाऱ्या लोकांचा संघ अस्तित्वात होता. हे विविध व्यापारी व व्यावसायिक आपापल्या संघांचा कारभार स्वतःच पाहात असत, आपल्या संघाची नियमावली बनवत व एखाद्या सभासदाने त्याच्या संघाच्या नियमांचे पालन केले नाही तर त्याला दंड करीत असत.

नगर पातळीवरील इतरही काही खात्यांचा कारभार पाहण्यासाठी विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात असे. गुप्तकाळात विविध नगरांमध्ये तीर्थयात्रा करणाऱ्यांसाठी व इतर प्रवाशांच्या सुविधेसाठी धर्मशाळा बांधण्यात येत असत. अशा धर्मशाळांमध्ये तीर्थंकर व इतर प्रवासी मुक्कामासाठी उतरत असत. गुप्तकाळात धर्मशाळा सर्व धर्मीयांच्या भाविकांसाठी खुल्या असत. ह्या धर्मशाळांमध्ये बौद्ध व इतर धार्मिय वा धर्मांच्या भाविकांनादेखील उतरता येत असे अशी माहिती काही अभ्यासक देतात. त्यामुळे धर्मशाळांचा कारभार व व्यवस्था पाहण्यासाठी एका विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती केली जात असे. धर्मशाळेची देखरेख पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला 'अवस्थिक' (Avasthika) असे म्हटले जात असे.

विशाल साम्राज्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, सैन्याच्या गरजा पुरविण्यासाठी, राजघराण्याचा खर्च चालविण्यासाठी, दानधर्म करण्यासाठी, लोकोपयोगी कामे करण्यासाठी तसेच एकूणच शासन व प्रशासन सुरळीतपणे चालविण्यासाठी तसेच लोकोपयोगी कामे करण्यासाठी गुप्त सम्राटांना आर्थिक तरतूद करावी लागत असे. त्यामुळे विविध करांची आखणी व आकारणी करून महसूल गोळा केला जात असे. गुप्तकाळात 'शेतसारा' हा महसूलाचा प्रमुख स्रोत होता. शेतसाऱ्यास वा शेतजमिनीवरील करास साम्राज्याच्या काही भागांत 'भागकर' (Bhagakara) तर काही भागांमध्ये 'उदरंग' (Udranga) असे म्हटले जाई. गुप्त साम्राज्यात एकूण कृषी उत्पादनातून किती प्रमाणात शेतसारा गोळा केला जात असे याविषयी नेमकी माहिती देता येणार नाही. परंतु असे म्हटले जाते की, त्याकाळात एकूण कृषी वा शेतीच्या उत्पादनाच्या एक चतुर्थांश वा एक षष्टमांश एवढा भाग सम्राट रयतेकडून शेतसारा म्हणून गोळा करत असावा. शेतसारा हा साधारणपणे शेतकऱ्याने जे पीक घेतले आहे वा धान्य पेरले आहे त्या धान्याच्या स्वरूपातच घेतला जात असे. त्यामुळे शासनाला व प्रशासनाला शेतसाऱ्याच्या स्वरूपात गोळा केलेले धान्य साठवून ठेवण्यासाठी धान्याची कोठारे बांधावी लागत असत. ही कोठारे बांधून झाल्यानंतर ती सुस्थितीत राहण्यासाठी वा ठेवण्यासाठी विशेष काळजी घेतली जात असे. शेतसाऱ्याप्रमाणेच त्याकाळात इतरही अनेक कर गोळा केले जात असत. शासन विविध बंदरांत उतरणाऱ्या मालावर कर लावत असे. हा कर मालाची आयात करणाऱ्या वा निर्यात करणाऱ्या तत्सम व्यापाऱ्यांनी शासनास द्यावयाचा असे. माल व विविध वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना व आणताना त्यावर 'जकात' लावली जात असे. हा 'जकात'रुपी कर शासनाच्या वा सम्राटाच्या उत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्रोत होता. विविध वस्तूंवर अबकारी शुल्क देखील घेतले जात असे. साम्राज्यातील पडिक जमीन, कुठल्याही कामासाठी वापरली न जाणारी जमीन, जंगले व वने तसेच कुरणे राज्याच्या मालकीची असत. शासन वा सम्राटही त्याच्या अखत्यारितील मालमत्ता इतरांना विविध कामांसाठी वापरण्यासाठी देत असे व त्यातून ती व्यक्ती जे उत्पन्न मिळवील त्यावर कर गोळा करत असे. त्याचप्रमाणे ह्या मालमत्तेतून शासनाला जे उत्पादन मिळे त्या उत्पादनाची विक्री करूनसुद्धा मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असे. याचाच अर्थ असा की, सम्राट त्याच्या ताब्यातील सर्वच वने वा जंगलसंपत्ती, पडिक जमीन तसेच इतर मालमत्ता इतर व्यक्तींना वापरण्यासाठी देईलच

असे नव्हते. उलट अनेकदा सम्राट ह्या स्रोतातून स्वतः उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करत असे हे विधान करणे चुकीचे ठरणार नाही. आणीबाणीच्या काळात वा राज्याला जास्त महसुलाची गरज असल्याने लोकांकडून अतिरिक्त प्रमाणात कर गोळा केला जाई. गुप्त सम्राटांचा कटाक्ष असे की, रयतेवर करांचा जास्त प्रमाणात बोजा पडता कामा नये. त्यामुळे गुप्त सम्राटांना आपल्या प्रजेची व त्यांच्या हिताजी काळजी असे, हे विधान करणे वावगे ठरू नये. याची पुष्टी आपणास चिनी प्रवाशी फा-हियान याने दिलेल्या माहितीवरून देखील होते. फा-हियानच्या निरिक्षणानुसार गुप्त काळात प्रजेवर जास्त करांचा बोजा टाकलेला नसे.

गुप्तांच्या सैन्याची संख्या मोठी होती व गुप्त सम्राटांकडे मोठ्या संख्येचे स्थायी सैन्य तैनात असे. त्यामुळे गुप्त सम्राट साम्राज्यावर एखादा हल्ला झाला वा शत्रू चाल करून आला तर अशा आव्हानाला सामोरे जाण्यास नेहमीच सज्ज असत. आपण पाहिलेलेच आहे की, गुप्त घराण्यातील समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, स्कंदगुप्त आदी गुप्त सम्राटांनी आपल्या शत्रूंचा बीमोड केला होता. त्याचप्रमाणे साम्राज्याचा विस्तारदेखील केला होता. त्यामुळे गुप्तांच्या काळात त्यांचे सैन्य प्रबळ होते व सैन्याची संख्यादेखील जास्त होती असे म्हणणे सयुक्तिक ठरते. गुप्तांच्या सैन्याचे अजून एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे गुप्तांचे मांडलिकत्व पत्करलेले राजे, तसेच गुप्त सम्राटांशी सलोख्याचे व मित्रत्वाचे संबंध असणारे राजेसुद्धा गुप्तांच्या सैन्यामध्ये सामील होण्यासाठी आपले सैनिक पाठवत असत. गुप्तांच्या सैन्यामध्ये प्रामुख्याने घोडदळ, पायदळ व हत्तीदळ हे तीन प्रमुख विभाग असत. गुप्तांच्या पूर्वीच्या काळातील प्राचीन भारतात रथाला सैन्यामध्ये अनन्यसाधारण महत्त्व होते. परंतु काही अभ्यासकांच्या मते गुप्तकाळात रथांचे सैन्यामधील महत्त्व कमी झाले होते.

गुप्तांच्या सैन्यामध्ये घोडदळाचे महत्त्व अनन्य साधारण होते. गुप्त सम्राट युद्ध व लढायां दरम्यान विविध प्रकारच्या सैनिकी वा लढण्याच्या व युद्ध करण्याच्या युक्त्या तसेच डावपेच वापरत असत. अशाच प्रकारे घोड्यांवरून शत्रूंवर तिरंदाजी करणे वा बाण सोडणे हे एक गुप्तांच्या युद्ध-नीतीचे प्रमुख वैशिष्ट्य होते. याचाच अर्थ गुप्तांच्या काळात धनुर्धरांचे लष्करी महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले होते असे म्हणणे वावगे ठरू नये. मात्र फरक एवढाच होता की, गुप्तपूर्व काळात हे धनुर्धर रथांमधून शत्रूंवर बाणांचा वर्षाव करत असत. परंतु गुप्तांच्या काळात धनुर्धर रथांऐवजी घोड्यावर बसून शत्रूंवर तिरंदाजी करत असत. यामुळे धनुर्धराला रणभूमीवर योग्य त्या ठिकाणी क्षणार्धात जाता येत असे. घोड्याला एका ठिकाणाहून शत्रूवर हल्ला करण्यास दुसऱ्या एखाद्या योग्य ठिकाणी नेणे रथांपेक्षा निश्चितच सोपे जात असणार. येथे एक मुद्दा मांडावासा वाटतो व तो असा की, धनुर्धरविद्या ही भारतवर्षातील अतिशय प्राचीन युद्धकला आहे. ही युद्धकला गुप्तांच्या पूर्वी देखील वापरात होती असे दाखले आपणास सापडतात. त्याचप्रमाणे हिंदू धर्माच्या पुराणांमध्ये व रामायण व महाभारतासारख्या महाकाव्यांमध्ये ह्या युद्धकलेचा संदर्भ येतो. रामायण हे मर्यादा पुरुषोत्तम भगवान राम व सीतामातेच्या जीवनावर आधारित महाकाव्य आहे हे आपणा सर्वांस ठाऊकच आहे. राम हा सर्वश्रेष्ठ धनुर्धर होता व त्याने लंकेचा राजा रावणाचा पराभव केला होता हे आपण रामायणात वाचतोच. त्याचप्रमाणे, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, श्रीरामाचे पुत्र लव व कुश, रावणपुत्र मेघनाद वा इंद्रजीत हे रामायणात वर्णिलेले श्रेष्ठ दर्जाचे धनुर्धर होते. महाभारतात देखील धनुर्धर विद्येचे संदर्भ येतात. परशुराम, पितामह भीष्म, द्रोणाचार्य, कर्ण, अश्वत्थामा, एकलव्य व अर्जुन हे श्रेष्ठ दर्जाचे धनुर्धारी होते असे आपण महाभारतात वाचतो. त्यामुळे धनुर्धारीविद्या ही भारतीय उपखंडात फार पूर्वीपासून युद्धात व लढायांमध्ये वापरली

जात असे व ही कला गुप्तांच्या काळात देखील अस्तित्वात होती. नव्हे, ह्या युद्धकलेचा वापर शत्रूविरोधात पुरेपूरपणे केला जात असे.

गुप्तांच्याकाळातील सैन्याचे अजून एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे राजस्थानसारख्या वाळवंटी प्रदेशांमध्ये सैन्यात उंटदळ वापरले जाई. यावरून उंट हा प्राणी वाळवंटात किती महत्त्वाचा आहे याचे ज्ञान त्याकाळात होते यात वाद नाही. सैन्याच्या वेगवेगळ्या शाखांवर देखरेख ठेवण्यासाठी विविध अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात असे. 'अश्वपती'(Asvapati), 'महाअश्वपती' (Mahaasvapati), 'पिलूपती'(Pilupati), 'महापिलूपती' (Mahapilupati) ही घोडदळातील (अश्वदळातील) व हत्तीदळातील काही अधिकाऱ्यांची पदनामे होत.

गुप्तांचे सैन्य साम्राज्याच्या विविध भागांत तैनात केलेले असे. हे तैनात केलेले सैन्य 'सेनापती' व 'महासेनापती' ह्या अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली वा देखरेखीखाली असे. केंद्रीय शासनाच्या पातळीवर एक सैनिकी विभाग वा खाते असे व ह्या विभागाचे काम सैन्याची भरती करणे, सैन्याला प्रशिक्षण देणे, त्यांच्या वेतनाची काळजी घेणे, सैन्याला आवश्यक ती शस्त्रास्त्रे उपलब्ध करून देणे; त्याचप्रमाणे सैन्यातील शिस्तीवर देखरेख ठेवणे हे असे. धनुष्यबाण, तलवारी, कुऱ्हाडी, भाले इत्यादी प्रकारची शस्त्रे त्याकाळात वापरली जात असत. शत्रूंच्या हल्ल्यांपासून स्वसंरक्षण करण्यासाठी सैनिक शिरस्त्राणे व चिलखत वापरत असत.

गुप्तकाळातील न्यायव्यवस्था ही पूर्वीच्या काळातील न्यायव्यवस्थेच्या तुलनेत जास्त प्रमाणात संघटीत होती असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. गुप्तांच्या काळात कायद्यांची अनेक पुस्तके वा ग्रंथ संकलीत करण्यात आली होती. असे म्हणतात की, गुप्तकाळात गुन्हेगारी विषयक कायद्यांची व नागरी कायद्यांची स्पष्ट व्याख्या करण्यात आली होती व ह्या दोन्ही प्रकारच्या कायद्यांमधील फरक देखील स्पष्ट केलेला होता. साम्राज्यातील न्याय व्यवस्थेचा प्रमुख राजा वा सम्राट असे. राजा न्यायदानाचे काम ब्राह्मण वर्गातील पुरोहित व विद्वानांच्या मदतीने करीत असे. ह्या धर्मगुरुंना कायद्यांविषयक ज्ञान असे व ते क्लिष्ट कायद्यांचा सुटसुटीतपणे व सोप्या भाषेत अर्थ सांगत असत असे म्हणणे वावगे ठरू नये. न्याय-विभागाचे कार्य सुरळीतपणे पार पाडण्यासाठी एका उच्च स्तरीय अधिकाऱ्याची नेमणूक केली जात असे.

न्यायदानाचे काम ग्राम, जिल्हा, प्रांत व केंद्रीय पातळीवर केले जात असे. जिल्हा पातळीवर स्थानिक कायस्थ मंडळींच्या सहाय्याने तेथील न्यायमूर्ती न्यायदान करण्याचे काम करत असत. न्यायदानाच्या कामात जिल्हापातळीवर व्यावसायिक तसेच इतर अधिकृत वर्गांतील व्यक्तींच्या सहाय्याने न्यायदान केले जात असे. ग्रामपातळीवर ग्राम परिषदेच्या सहाय्याने राजाने नियुक्त केलेली अधिकारी मंडळी न्यायदानाचे काम करीत असत. त्याचप्रमाणे अनेक व्यापारी व इतर व्यावसायिक संघांमधील वादविवाद व तंटे सोडविण्यासाठी त्यांची न्यायाधिकरणे (Tribunals) असत. फा-हियानकडून आपणास अशी माहिती मिळते की, गुप्तकाळातील कायदे सौम्य स्वरूपाचे असत. अपराधी व्यक्तींना त्यांनी केलेल्या अपराधांच्या गांभीर्यानुसार दंड आकारून शिक्षा केली जात असे. मृत्यूदंड वा फाशीची शिक्षा त्याकाळात दिली जात नसे, अशी माहिती आपणास काही अभ्यासकांकडून मिळते.

अभ्यासकांचे असे मत आहे की, गुप्तांच्या साम्राज्यात गुप्तांचे मांडलिकत्व पत्करलेल्या राजांच्या प्रदेशांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता. त्यामुळे अशा प्रदेशांतील प्रशासनाची व्यवस्था पाहणे ही तत्सम राजांची जबाबदारी असे. साम्राजाच्या अशा प्रकारच्या

(पृष्ठ क्र. २६ वर)

ज्याची स्वतःवर सत्ता आहे तोच खरा सत्ताधीश. - सिनेका

# आत्मचरित्राबाबत...

*आत्मचरित्र हा चरित्राचाच एक प्रकार आहे. चरित्रात लेखक आणि नायक हे वेगवेगळे असतात. चरित्राप्रमाणे आत्मचरित्रसुद्धा परिपूर्ण असू शकत नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंतची हकिगत त्यात येऊ शकत नाही. डब्ल्यू. एच. डन या समीक्षकाने म्हटले आहे, ''आत्मचरित्र म्हणजे मस्तक आणि अवयवरहीत मूर्ती.'' आत्मचरित्रकार आपल्या मनःप्रवृत्तीच लोकांपुढे उघड्या करून दाखवतो, निरनिराळ्या प्रसंगांची संगती लावतो, म्हणून चरित्रापेक्षा आत्मचरित्र अधिक वाचली जातात. – संपादक*

चरित्र हे नाटकासारखे असते, तर आत्मचरित्र हे भावगीतासारखे असते. जसे भावगीत हे आपले विचार, भाव आदींना वाट करून देण्याचे साधन किंवा माध्यम असते, तसे आत्मचरित्रही असते. आपल्या जीवन–यात्रेत जे बरेवाईट अनुभव येतात, ते दुसऱ्यांना सांगितल्याने मन हलके होते,–

**'स्निग्धजनसंविभक्तं दुःखं सह्यवेदनं भवति।'**

या न्यायानं आपली दुःखे इतरांस सांगितली असता हृदयभार निम्मा होतो. आपल्या सुखद प्रसंगात दुसरा वाटेकरी झाला म्हणजे आपला आनंद दुणावतो. 'आपल्या कार्याचा किंवा एकूण अनुभवांचा वृत्तांत आपण लिहून काढतो, हा मानवी स्वभावगुण आहे;' असे न. चिं. केळकरांनी सांगितले आहे.

आत्मचरित्रलेखनात स्वयं–स्फूर्तता असते. कर्तव्यभावाने लिहिलेल्या आत्मकथनात हा गुण सहसा आढळत नाही.

आत्मचरित्र लिहिणे साधे, सोपे, सरळ नसते. ते लिहिण्यासाठी कलादृष्टी लागते. कित्येक धोरणे सांभाळावी लागतात. प्रसिद्ध फ्रेंच लेखक रुसो याने आपल्या आत्मचरित्राला 'कन्फेशन्स' (कबुलीजबाब) असे नाव दिले आहे. त्यात त्याने म्हटले आहे, ''जेव्हा मला देवघरचे बोलावणे येईल, तेव्हा मी माझे हे पुस्तक त्याच्यासमोर ठेवीन. त्याला सांगेन, 'मी अशा तऱ्हेने जगात वागलो, त्याचा हा आलेख आहे. माझी पाप–पुण्याची ही नोंद प्रामाणिक आहे.' असे म्हटल्यावर मी एकप्रकारे प्रायश्चित्त घेतल्यासारखे होईल आणि मला हलके हलके वाटेल.''

याशिवाय आपल्याबाबतचे गैरसमज दूर करून आत्मसमर्थन करणे हाही हेतू त्या लेखनाचा असू शकतो. अर्थात अशी आत्मचरित्रे गौण मानली जातात, यात नवल नाही. रंगाऱ्याच्या गरीब घरात जन्म घेतलेल्या जबरदस्त महत्त्वाकांक्षी हिटलरचे 'माझा लढा' हे आत्मचरित्र आत्मसमर्थनाचा उत्तम नमुना आहे. मुसोलिनीचे आत्मकथन असेच आहे. हे दोघे हुकूमशहा काहींना आवडतात, तर काहीजण तिरस्कार करतात. आत्मचरित्रांविरुद्ध पुष्कळवेळा आक्षेप घेण्यात येतात. स्वतःची उत्तम बाजू दाखवण्याचा मोह अशावेळी होतो. 'मला दुसऱ्याचे मन मोडवत नाही. मी अत्यंत भीडस्त आहे. संकोची वृत्तीचा आहे. हा माझा दोष आहे.' असे महर्षी कर्वे यांनी आपल्या आठवणींत सांगितले आहे. तेव्हा काही विद्वानांनी (अर्थात पुणेकर!) 'हा फाजील विनय असून स्वस्तुती आहे' असा आरोप केला होता!

रेव्हरंड ना. वा. टिळक आणि वॉल्ट व्हिटमन (तृणपर्णे हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे.) यांनी आपले गुणदोष प्रामाणिकपणे सांगितले आहेत. सत्यकथन फार कठीण असते. अँथनी ट्रोलोप हा इंग्लिश कादंबरीकार

जर मी स्वतःलाच जिंकू शकत नाही, तर मी इतरांना कसा जिंकणार? – रबेलाइस

म्हणतो, 'प्रत्येक माणूस जीवनात काही गोष्टी अशा करत असतो, त्या जगाला कळू नयेत म्हणून तो खबरदारी घेतो. तेव्हा आत्मकथनकाराला पूर्ण सत्य सांगणे अशक्य असते.' इझाडोरा डंकन या जगप्रसिद्ध नर्तकीने सांगितले आहे की, 'आपले स्वतःचे व्यक्तिमत्त्व किंवा व्यक्तित्त्व कोणते हे कळणे कठीणच असते. आपल्या मित्रांना आपण निराळे दिसतो. आपल्या प्रेयसी किंवा प्रियकराला वेगळे म्हणून स्वतःला समजून घेणे कठीणच. दोन माणसे एकमेकांशी बोलतात तेव्हा खरोखर सहा माणसे बोलत असतात.'

यावर एवढेच सांगायचे की, ज्याला प्रबळ इच्छा होईल, त्याने 'जग काय म्हणेल' याची पर्वा करू नये. जग काही ना काही म्हणत असतेच. आपल्याला जे योग्य वाटेल ते लिहावे. लोकांना तर्ककुतर्क करू द्यावेत. आत्मचरित्र हे खरोखर मानसशास्त्राच्या भुमिकेवर आधारलेले असते. आपल्या विचारांत जी उत्क्रांती झाली, ती चित्रित करण्यासाठी आत्मचरित्रकाराने मानसशास्त्राचा अभ्यास करणे आवश्यक असते.

चरित्रवाङ्‌मयावरील निबंधात म्हटले आहे की, मराठीत उत्कृष्ट चरित्रग्रंथ जवळजवळ नाहीतच. आत्मचरित्राबाबत काही उत्तम ग्रंथ आहेत, हे मान्य करायला हवे. १८७१ मध्ये दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रापासून आतापर्यंत काही दर्जेदार आत्मकथा लिहिल्या गेल्या आहेत. 'आत्मवृत्त' (१९१५) हे कर्वे यांचे आत्मचरित्र (भले मोठे) आदर्श उदाहरण म्हणून सांगितले जाते. न. चिं. केळकरांच्या 'गतगोष्टी', ल. रा. पांगारकरांचा 'चरित्रचंद्र' हेही उत्तम आहेत. आत्मचरित्रांतील आलेखनांत जो स्वाभाविकपणा व जिवंतपणा दिसतो, तो चित्रांत वा चरित्रांत क्वचितच दिसून येतो.

एथेल मॅनिन नामक इंग्लिश लेखिकेने 'कन्फेशन्स ॲन्ड इंप्रेशन्स' या नावाचे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यात तिने आपल्या आयुष्यातील काही रहस्ये उघड केली आहेत. इतर लोकांविषयी काही वादग्रस्त मुद्दे तिने टाळले आहेत. याबाबत ती सांगते, 'मी आणखीही पुष्कळ मनोरंजक गोष्टी सांगू शकले असते. आपण स्वतःबद्दल सर्व गुपिते उघड करू शकतो, परंतु दुसऱ्यांच्या बाबतीत असे करण्याचा आपल्याला काय अधिकार आहे? म्हणजे काय, तर कुठल्या गोष्टी लिहाव्यात, कुठल्या टाळल्या म्हणजे इतरांची बदनामी होणार नाही, याचा विचार करायला हवा. दुसऱ्यांच्या अप्रिय गोष्टी जगजाहीर करणे हा असभ्यपणा समजला जातो.'

जॉन स्टुअर्ट मिल हा बालपणी अलौकिक बुद्धीचा होता. वयाच्या सहाव्या वर्षी तो मोठमोठी पुस्तके वाचू लागला. त्याने आपल्या तिसऱ्या-चवथ्या वर्षाच्या वयातील आठवणी सांगितल्या आहेत. हर्बर्ट स्पेन्सर याने आपल्या तिसऱ्या वर्षातील प्रसंग टिपताना त्याच्या धाकट्या बहिणीच्या मृत्यूची आठवण सांगितली आहे, तर पांगारकरांनी नोंद केली आहे, 'पहाटेस आई अन् ताई जात्यात भरण घालीत अन् दळण दळीत. समर्थ रामदासकृत 'अंजनीगीत' त्या गात असत. तेव्हा मी ताईच्या मांडीवर डोकं ठेवून पुन्हा झोपत असे. 'लंकेहूनी अध्योध्येस येता। राम लक्ष्मण अन् सीता।।' हे गाणे वयाच्या तिसऱ्या वर्षी ऐकले होते, ते आयुष्यभर त्यांना तोंडपाठ येत होते. असो. बालपणीच्या आठवणी तुटक आणि तुरळकपणे लोकांना आठवतात. अशावेळी 'मला साधारणपणे असे आठवते' असा शब्दप्रयोग जरूर करावा, म्हणजे लेखकावर निदान असत्य कथनाचा आरोप येऊ शकत नाही.

लेस्ली स्टीफन या समीक्षकाने जॉन स्टुअर्ट मिल याच्या संबंधात असे लिहिले आहे की, मिलने पत्नीची स्तुती करताना स्वतःचीच अप्रत्यक्ष स्तुती केली आहे. आपल्या यशाचे पुष्कळसे श्रेय आपल्या पत्नीला देणारे पुष्कळ पुरुष आढळतात. रुसोच्या 'कन्फेशन्स' मध्ये त्याचे पत्नीबाबतचे विचार वाचनीय आहेत, 'माझे माझ्या

बायकोवर आधी फार प्रेम होते. नंतर ते हळूहळू मावळत गेले. तनामनाने माझ्याशी समरस होणारी जीवाची जिवलग स्त्री मला हवी होती. ती जागा पत्नी कधीच भरून काढू शकणार नाही, याची जाणीव होती मला. तिच्या घरची माणसे भलतीच विक्षिप्त होती. त्यांचे माझे कधीच पटले नाही. ती माहेरच्या लोकांच्या डोक्याने चालत असे. म्हणूनच आमच्यात सतत मतभेद होत असत...'

रुसोने ५५ वर्षांच्या आयुष्यात असंख्य स्त्रियांवर प्रेम केले. वयाच्या बाराव्या वर्षी तो वीस-बावीस वर्षे वयाच्या तरुणींवर (एकाच वेळी तिघींवर) प्रेम करू लागला. पुढे लग्न झाल्यावरही तो अनेक जणींच्या प्रेमात पडला. शारीरिक आकर्षण हाच मुख्य भाग असल्याचे त्याने कबूल केले आहे. त्याला पाच मुले झाली. त्यांना अनाथाश्रमात ठेवले. कारण काय तर तो आर्थिकदृष्ट्या असमर्थ होता! पत्नीच्या माहेरची माणसे इतकी मूर्ख होती की, मुलांना त्यांच्याकडे ठेवण्यापेक्षा अनाथाश्रमात त्यांना उत्तम शिक्षण मिळण्याची खात्री होती. मात्र कालांतराने या कृत्याचा त्याला पश्चात्ताप होत असे.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा. बहुतेक चरित्रकार आणि आत्मचरित्रकार हे वैवाहिक जीवनाबद्दल खुलासेवार लिहिण्याचे टाळतात किंवा मोजका मजकूर मांडतात. त्यांच्या यशामागे 'ती' असल्याचे मोघमपणे सांगतात. गृहजीवनाचे तपशील प्रशस्त वाटत नाहीत. मराठीत याबाबतीत भलताच पोलादी पडदा असतो. एच. जी. वेल्स याने आपल्या पहिल्या लग्नाची कथा फार सुंदर रीतीने रेखाटली आहे. घटस्फोटाची कथाही स्पष्टपणे सांगितली आहे. तारुण्याच्या भरात अन् लावण्याच्या मोहात त्याने लग्न केले. नंतर लक्षात आले, आपली निवड चुकली आहे! नंतर त्याने दुसऱ्यांदा लग्न केले. मोहाचे प्रसंग, प्रेम, प्रणय इतर अनुभवांबरोबरच देहसुख यांचे वर्णन करणारे धैर्यवान चरित्रकार / आत्मचरित्रकार अगदी थोडेच असतात. देशी आणि विदेशी ग्रंथलेखनात हाच फारक असतो की, आपल्याकडे मनमोकळेपणा नाही, तर तिकडे स्वैर सुखाची संस्कृती. एकमेव अपवाद म्हणजे म. गांधी लिखित 'सत्याचे प्रयोग.'

इथे केळकरांच्या 'गतगोष्टी'तील मनोगताची पुन्हा आठवण येते. ते म्हणतात, 'मी व्यक्ती आणि समाज ही समष्टी यांचा जो संबंध आला, तीच माझी जीवनयात्रा.' केळकरांच्या ललितमधुर भाषाशैलीचा आणि कल्पनाशक्तीचा उत्तम मसाला आहे. अभिजात विनयशीलता, प्रामाणिकता, दुर्दम्य आत्मविश्वास यांची प्रचीती 'गतगोष्टी' वाचताना येते. त्यांनी म्हटले आहे, 'माझ्या यशाचा काही वाटा मला मिळालेल्या अनुकूल परिस्थितीला असेल. तथापि केवळ बुद्धिमत्ता, कर्तृत्व, व्यवहारचातुर्य या दृष्टीने पाहता मी बरोबरीच्या इतर लोकांहून श्रेष्ठ किंवा अलौकिक ठरणार नाही. दुसरे असे की, मी महत्त्वाकांक्षी कधीच नव्हतो, पण नशीबवान खरा! म्हणूनच माझा उत्कर्ष होत गेला. दैवाने साथ दिली नसती, तर माझी होडी कोणत्या किनाऱ्यास लागली असती, हे सांगणे कठीण आहे...'

स्वतःबद्दल आपल्याला सर्वात जास्त माहिती असते. त्यामुळे तटस्थपणे निरीक्षण करणे अवघड होऊन बसते. प्रसिद्ध जर्मन कवी गटे याच्या आत्मकथाग्रंथाचे नाव आहे 'पोएट्री ॲन्ड ट्रूथ'. नावातच पुस्तकाचे स्वरूप उघड झाले आहे. रुसो हा बालपणी चोऱ्या करत असे, हे त्यानेच सांगितले म्हणून ठीक. नाही तर चरित्रकारास हे कळणे शक्यच नव्हते. तसेच जोसेफ कॉनरॉड या प्रसिद्ध दर्यावर्दी कादंबरीकाराने 'अ पर्सनल रेकॉर्ड' या आत्मचरित्रात 'ऑलमेअर्स फॉली' या कादंबरीबाबतची मनोरंजक माहिती दिली आहे. तेव्हा तो सागरी प्रवास करत होता. काही महिन्यांचे वा वर्षांचे अंतर लेखनात त्यामुळे पडले होते. त्यापायी ती कादंबरी काहीशी विस्कळीत आहे.

इतिहासकार गिबन याने 'डिक्लाईन ॲन्ड फेल ऑफ द रोमन एम्पायर' या ग्रंथनिर्मितीची कथा आपल्या आत्मचरित्रात सांगितली आहे. '१५ ऑक्टोबर १७६४ या दिवशी मी रोम शहरातील भग्न अवशेषांजवळ बसलो होतो. या शहराचा उदयास्त आपण लिहावा अशी कल्पना तेव्हा सुचली.' हळूहळू आराखडा तयार होत गेला. इतिहास ग्रंथांचा फडशा पाडला, पण चार वर्षे काही त्यावर लेखन करता आले नाही. थोडेसे लिहून झाले की, वाटायचे यापेक्षा उत्तम हवे. अखेर बारा वर्षांनी म्हणजे १७७६ मध्ये पहिला खंड लिहून झाला! पुढे बारा वर्षांनंतर सर्व खंड पूर्ण झाले. लेखकाचे आत्मचरित्र अशाप्रकारे वेगळे असते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील दुर्मिळ चरित्रे / आत्मचरित्रे यांची दखल घेऊन हे लेखन केले आहे. स्वातंत्र्यानंतर चरित्रे/आत्मचरित्रे पुष्कळ प्रमाणात प्रकाशित झाली. आधुनिक काळातही अच्युत गोडबोले यांच्या 'मुसाफिर' या आत्मकथनास प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे दिसते. १९५० नंतरची बहुतेक चरित्रे / आत्मचरित्रे वाचायला मिळतात, परंतु मराठीच्या गद्यलेखनाच्या आरंभकाळात प्रकाशित झालेल्या ग्रंथांवर एक नजर टाकून त्यांचा परिचय देण्याचा प्रयत्न केला आहे. याचा अभ्यासासाठी उपयोग निश्चितच होईल अशी खात्री आहे.

**अभ्यासासाठी :**

१. चरित्र-आत्मचरित्र - प्रा. अ. म. जोशी (१९५६)

२. आत्मचरित्र मीमांसा - प्रा. आनंद यादव (१९९०)

**- अरविन्द दोडे**
शालन भोईर वाडी, खोपट,
साहिल हॉस्पिटलजवळ,
ठाणे (प.).४०० ६०१
भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२

•••

(पृष्ठ क्र. २२ वरून - **गुप्तकालीन भारत : प्राचीन भारतातील 'सुवर्णयुग'**)

सं-रचनेमुळे मौर्यांच्या तुलनेत गुप्त सम्राटांच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची संख्या कमी होती असे निरीक्षण काही अभ्यासकांनी मांडले आहे. त्याचप्रमाणे गुप्तांच्या प्रशासनाचे अजून एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रशासनाच्या विकेंद्रिकरणाचे तत्त्व हे होय. गुप्तांच्या साम्राज्याची सं-रचना मौर्यांच्या साम्राज्यापेक्षा थोडी वेगळी असल्यामुळे त्यांना मौर्यांप्रमाणे विस्तृत व मोठ्या प्रमाणात नोकरशाही बाळगण्याची आवश्यकता नसल्याचे मत अनेकांनी मांडले आहे. भारतीय राजकीय प्रणालींतील गुप्तपूर्व काळातील काही परंपरा व गुप्तांनंतरच्या परंपरा यांच्यातील दुवा वा सुवर्णमध्य म्हणजे गुप्तकालीन प्रशासन व्यवस्था होती असे म्हणणे वावगे ठरू नये. गुप्तांनी आपल्या पूर्वीच्या काळात अस्तित्वात असलेल्या अनेक प्रशासकीय परंपरा व तत्त्वे तर स्विकारलीच परंतु त्याचसोबत अनेक नवीन परंपरा, तत्त्वे व पद्धतीसुद्धा अंगीकारल्या असे म्हणणे सयुक्तीक ठरेल. गुप्तांनी त्यांच्या काळात प्रशासनात आणलेल्या वा अंगिकारलेल्या सुधारणा भविष्यात देखील अनेक शासकांनी व राजांनी स्विकारलेल्या असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळेच मध्ययुगीन काळाच्या सुरुवातीस भारतातील विविध भागांमध्ये जी प्रशासकीय प्रणाली तेथील तत्सम शासकांनी वा राजांनी स्विकारलेली होती त्याची पाळेमुळे गुप्तकालीन प्रशासन व्यवस्थेत सापडतात अशा आशयाचे मत काही अभ्यासकांनी मांडले आहे.
क्रमशः

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••

जर रहस्य जतन केलेत तर ते तुमचा गुलाम बनते, जर उघडे केलेत तर ते तुमच्या डोक्यावर बसते. - अरेबियन म्हण.

# तेथे कर माझे जुळती
# विविध क्षेत्रांतील आजची स्त्री

*विविध क्षेत्रांतील स्त्रीयांच्या कामगिरीचा आढावा या लेखात घेतला आहे - संपादक*

आधुनिक जगातील स्त्रीची विविध रूपे आहेत. स्त्री आज कोणत्याही क्षेत्रात मागे नाही, उलट कांकणभर सरसच आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे स्त्रीमध्ये असलेला मातृत्वाचा उमाळा, जिव्हाळा.

''लळा, जिव्हाळा शब्दची खोटे, कुणी कुणाचे नाही''

हा जरी जगाचा न्याय असला तरी मातृत्व त्याला अपवाद आहे. म्हणूनच अवघ्या संतांनी 'विठोबाला' 'माउली' या नावाने साद दिली.

जिथे काही उणेपणा आहे, अपुरेपणा आहे ते ते आपल्या 'मातृभावाने' भरून काढण्यासाठी आधुनिक स्त्री उभी आहे आणि म्हणूनच आचार्य विनोबा अत्यंत नम्रभावाने म्हणतात-

'गीताई माउली माझी,
तिचा मी बाळ नेणता,
पडता रडता घेई, उचलोनी कडेवरी।।'

**थोर समाजसेविका**

असे म्हणतात की प्रत्येक स्त्री ही हाडाची शिक्षिका असते. आणि म्हणूनच समाजकार्याचा धडा घालून देण्यासाठी समाजाने ज्यांच्याकडे पाठ फिरवली आहे. अशांना आपल्या मदतीचा हात देण्यासाठी धावल्या मदर तेरेसा, अनुताई वाघ, सिंधूताई सकपाळ यासारख्या समाजसेविका.

अनाथ बालकांच्या मनात जगण्याविषयी नवी जिद्द निर्माण करून मदर तेरेसानी त्यांना जगण्याचा खरा अर्थ समजावून सांगितला.

'आदि'वासी नसूनही समाजाने 'अंत्य' वासी ठरविलेल्या लोकांचे चिमुकले पण स्वतंत्र विश्व अनुताईंनी कोसबाडच्या टेकडीवर उभे केले.

हजारो अनाथ मुलांची 'माय' सिंधूताई सकपाळ सांगतात. -

''स्वतः मरून संपण्याआधी
मरणांसाठी जग!''

खरंच असं म्हटलं जातं आईचा दर्जा ईश्वरापेक्षा मोठा आहे.

सिंधूताई सकपाळ आज २००० मुलांची आई, २४२ जावई व ४२ सुना आहेत. यांची मुले डॉक्टर, वकील, इंजिनिअर अशा मोठ्या मोठ्या पदावर आहेत.

सर्व सुखांवर पाणी सोडून गरिबांच्या सेवेला वाहून घेणे हे किती अवघड काम आहे. पण गोदावरीताई परुळेकरांनी ते दिव्यही केले.

साधनाताई आमटे या तर पतिकार्यात 'आनंदवनात' समरसून गेल्या होत्या.

समाजाची जाचक बंधने मोडून काढून स्त्री शिक्षणाची वाट मोकळी करून देणाऱ्या पहिल्या स्त्री शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणजे 'सावित्रीबाई फुले'.

स्त्री नि पुरुष समाजरथाची दोन चाके आहेत. दोन्ही समान चालली पाहिजेत हा विचार आला नि स्त्रियांना पुढे कितीतरी कार्यक्षेत्रे खुली झाली. या साऱ्यांसाठी पहिलं पाऊल उचललं ते सावित्रीबाईंनी. म्हणूनच स्त्री कर्तृत्वाच्या आलेखात त्यांचं योगदान फारच मोलाचं आहे.

हे सारे करताना या स्त्रियांना काय कमी कष्ट पडले असतील? शुन्यातून नंदनवन फुलवताना यांनी काय कमी खस्ता खाल्ल्या असतील? पण महात्माजींनी म्हटलेच आहे -

'स्त्री ज्या क्षेत्रात प्रवेश करते तेथे प्रेम आणि माणुसकीचा विरत चाललेला धागा बळकट करते.'

हे बोल शब्दशः खरे करून दाखविणाऱ्या समाजसेविकांच्या ठायी मला दिव्यत्वाची खरी प्रचीती येते.

शारदेच्या हातातली झंकारते वीणा!

**वाङ्मय क्षेत्र**

स्त्रीने वाङ्मय क्षेत्रातही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. काव्यक्षेत्रात प्रवेश करून तिने जादूमय वातावरण निर्माण केले.

मन वढाय वढाय, मन वढाय वढाय
उभ्या पिकतल ढोर, मन वढाय वढाय
किती हाकलं हाकलं फिरुनी येतं पिकांवर

बहिणाबाई ह्याही आपल्या कवितेतून सांगतात-

अरे, संसार संसार जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके, तेव्हा मिळते भाकर

बहिणाबाईंसारखी अशिक्षित, खेडवळ स्त्री. किती सोप्या शब्दांत जीवनाचे केवढे मोठे तत्त्व सांगून गेल्या!

स्त्रीच्या अंगोपांगी कोमलता, शालीनता मुरलेली असते. नवकाव्याच्या पाईक असणाऱ्या शांता शेळके, इंदिरा संत यांच्या काव्यात हे भाव उमटले.

पंजाबी लेखिका अमृता प्रीतम, हिंदी लेखिका महादेवी वर्मा यांनी आपल्या लेखनाला पुरस्कार मिळवून दिला आहे व साहित्यक्षेत्रात आपले नाव अजरामर करून ठेवले आहे.

लक्ष्मीबाई टिळकांची स्मृतीचित्रे तर मराठी साहित्याला मिळालेले लेणेच आहे.

नाट्य आणि चित्रपट सृष्टीत रोहिणी हट्टगडी, रिमा लागू, स्मिता तळवळकर इत्यादींनी ठसा उमटविला आहे.

नाट्य-चित्रपट लेखनाच्या आणि दिग्दर्शनाच्या क्षेत्रात सई परांजप्यांसारख्या गुणी कलाकार पुढे आल्या आहेत. गायनक्षेत्रात तमिळनाडूच्या सुप्रसिद्ध गायिका सुब्बलक्ष्मी, 'गानहिरा हिराबाई बडोदेकर' यांनी नवा रंग भरला.

संगीत म्हटल्यावर जागतिक कीर्ती मिळालेल्या लता मंगेशकर आणि आशा भोसले यांची नावे घेण्यास कोण बरे विसरेल!

**अंगणापासून क्रीडांगणापर्यंत!**

अंगणात तुळशी वृंदावनासमोर गोपद्म रेखाटणारी स्त्री आज क्रीडांगण गाजवले आहे. ऑलिम्पिकच्या धावण्याच्या स्पर्धेत अंतिम फेरी गाठणाऱ्या पी. टी. उषा या भारतीय महिलेचे नाव उदाहरणादाखल घ्या ना!

तसेच भारताची राष्ट्रीय विक्रमवीर आणि आशियातील सर्वात उत्कृष्ट धावपटू ललिता बाबर!

टेनिस खेळात एखाद्या पुरुषानेही मान खाली घालावी असा खेळ करून क्रीडारसिकांना तोंडात बोटं घालावयास

लावणारी मार्टिना नवरातिलोव्हा तसेच सानिया मिर्झा इत्यादी.

उत्तुंग अशा हिमशिखरांनी भारतीय महिलेला साद दिली आणि बर्चीद्रीपाल या भारतीय महिलेने 'एव्हरेस्ट' सर करण्याचा विक्रम केला.

अंटार्क्टिकावरील कडक थंडीनेही भारतीय स्त्री थिजली नाही. 'अंटार्क्टिका मोहिमेवर' जाणारी 'पहिली भारतीय महिला' हा बहुमान आदिती पंत हिने मिळविला.

**संरक्षण व्यवस्था**

देशाच्या संरक्षणाची धुराही भारतीय स्त्रीने काही प्रमाणात उचलली आहे. भारतीय सैनिक स्त्री ही केवळ सीमासंरक्षणच करत नाही, तर कांगोसारख्या अराजकग्रस्त प्रदेशात जात आहे. आजची स्त्री स्वावलंबी आहे.

तसेच वाहतुक क्षेत्रात साताऱ्याची सुरेखा पहिली भारतीय महिला ट्रेन ड्रायव्हर झाली.

कोण म्हणतो स्त्री म्हणजे अबला?

स्त्री हे प्रेमाचे, त्यागाचे प्रतीक आहे. तिचे क्षेत्र कुटुंबापुरतेच मर्यादित न राहता ते व्यापक बनले पाहिजे. स्त्रीने राजकारणात प्रवेश केला तर ते स्वच्छ, सुदृढ होईल! याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे भारताच्या दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी.

तसेच आताच्या काळातील देशाच्या विदेश मंत्री व वरिष्ठ नेत्या सुषमा स्वराज!

पण खरोखरच दूरदृष्टीने विचार केला तर आजची स्त्री आणि 'हृदयी अमृत, नयनी पाणी' असा शिक्कामोर्तब झालेली जुन्या काळातील स्त्री यांच्यात जमीन-अस्मानाचा फरक जाणवतो.

चार भिंतींत सतत कोंडली गेलेली स्त्री नोकरी, प्रवास, शिक्षण या निमित्ताने मोकळ्या हवेत आली आहे. स्त्रीने नोकरी करायची नाही, घर सांभाळायचे अशा विचारांच्या बुरसटलेल्या चौकटी तिने मोडून काढल्या आहेत.

रवींद्रनाथानी म्हटलेच आहे -

'आज जगात सर्वत्रच स्त्री घराचा उंबरठा ओलांडून विश्वाच्या प्रांगणात आली आहे.'

खरोखरच स्त्रीने आज सर्व क्षेत्रे आपल्या विकासासाठी उपलब्ध करून घेतली आहेत.

**भारतातील पहिल्या स्त्री रत्ने**

१. कार्नोलिया सोरावजी - पहिली महिला बॅरिस्टर.
२. कौशल्या खोब्रागडे - पहिली महिला पोस्टमन.
३. आनंदीबाई जोशी - परदेशातून पदवी घेऊन येणाऱ्या पहिली महिला डॉक्टर.
४. सुरेखा भोसले - पहिली महिला रेल्वे ड्रायव्हर.
५. सावित्रीबाई फुले - भारताच्या पहिल्या धाडसी सेवाभावी महिला शिक्षिका आणि मुख्याध्यापिका.
६. इंदिरा गांधी - पहिल्या पंतप्रधान. भारतरत्न. बंगाल देशाची निर्मिती.
७. कल्पना चावला - पहिली भारतीय धाडसी अंतराळवीर
८. सुनिता विल्यम - अंतराळात संशोधन करणारी भारतीय वंशाची स्त्री.
९. सरोजिनी नायडू - पहिल्या राज्यपाल, राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अध्यक्षा.
१०. विजयालक्ष्मी पंडित - युनोच्या आमसभेच्या पहिल्या महिला अध्यक्षा.
११. अरुंधती रॉय - मानाचा सर्वोत्तम बुकर पुरस्कार मिळविणारी पहिली महिला.

ज्याला आराम हवा असतो, तो विद्वान व्हायच्या लायकीचा नाही. - कॅन्फ्युशिअस

१२. ॲनी बेझंट – होमरुल चळवळ, राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अध्यक्षा.

१३. मेधा पाटकर – थोर सामाजिक कार्यकर्त्या, नर्मदा बचाव आंदोलनाच्या महान नेत्या.

१४. माधुरी दीक्षित – सौंदर्य सम्राज्ञी, लोकप्रिय अभिनेत्री. अनेक सन्मान.

१५. मदर तेरेसा – नोबेल पुरस्कार प्राप्त जगप्रसिद्ध पहिल्या सेवाभावी भारतरत्न महिला.

१६. लता मंगेशकर – सर्वश्रेष्ठ प्रख्यात पार्श्वगायिका, भारतरत्न, खासदार.

१७. ऐश्वर्या रॉय – पहिली भारतीय मिसवर्ल्ड, जगात सुंदरी, प्रसिद्ध अभिनेत्री.

१८. बचेंद्रीपाल – एव्हरेस्टवर आरोहण करणारी पहिली भारतीय स्त्री.

१९. प्रतिभाताई पाटील – भारताच्या पहिल्या वंदनीय महिला राष्ट्रपती.

२०. सुस्मिता सेन – जगात विश्वसुंदरी किताब मिळविणारी पहिली भारतीय महिला.

२१. पी. टी. उषा – धावण्यामध्ये जगात चौथी तर आशियात व भारतात प्रथम.

२२. सानिया मिर्झा – स्टार टेनिसपटूचे भारतात प्रथम तर जगात पहिल्या पन्नासात स्थान.

२३. मायावती – उत्तर प्रदेशच्या चार वेळा मुख्यमंत्री, ब.स.पा.च्या लोकप्रिय महिला.

२४. किरण बेदी – पहिला आय. पी.एस. अधिकारी, मॅगेसेसे पुरस्कार प्राप्त.

२५. रझिया सुल्तान – दिल्लीच्या तख्तावर बसणारी पहिली महिला.

२६. भिकाजी कामा – भारताचा तिरंगा प्रथम फडकवणारी पहिली महिला क्रांतीकारक.

२७. आशापूर्णादेवी – भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार मिळविणारी पहिली महिला.

२८. प्रेमा माथूर – भारतीय पहिली महिला वैमानिक.

२९. देविकाराणी – दादासाहेब फाळके पुरस्कार मिळविणारी पहिली महिला.

**– सौ. कांचन गणेश मोहिते**
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
प्राथमिक विभाग, ठाणे

●●●

---

(पृष्ठ क्र. १४ वरून – **आरोग्यवेध–०६ आरोग्य व स्वस्थता ह्यांचे निकष**)

अभ्यासाची उद्दिष्टे राजा रंतिदेवाच्या खालील उक्तीत स्पष्टपणे अभिव्यक्त होतात.

न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं न पुनर्भवम् ।
कामये दुःखतप्तानां प्राणिनां आर्तिनाशनम् ।।

ह्याचा अर्थ असा आहे की, मला राज्य नको, स्वर्ग नको, पुनर्जन्मही नको, मात्र सर्व दुःखपीडित प्राण्यांची दुःखे लयास जावोत अशीच माझी इच्छा आहे.

आपणही तशीच कामना करू या. त्याकरता प्रयास करू या. आरोग्यवान होऊ या. स्वस्थ होऊ या.

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

---

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

सोमवार दि. १५ जानेवारी २०१८ ते दि. १९ जानेवारी २०१८ अखेर इ.१ली ते इ.४थी च्या विद्यार्थ्यांची दुसरीआकारिक मूल्यमापन चाचणी घेण्यात आली.

मकर संक्रांत – वर्गावर्गात 'मकर संक्रांत' 'सूर्य संक्रमण' याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. सुगड पूजन, हळदीकुंकू, तीळगूळ यांचे महत्त्व विशद करण्यात आले. आपले भारतीय सण, परंपरा हे वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवून आपण साजरे करावेत हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

**ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले**

दि. २० जानेवारी २०१८ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले 'लेक वाचवा, लेक शिकवा अभियान' कार्यक्रम इ.१ली ते इ.४थीच्या विद्यार्थ्यांचा घेण्यात आला. दीपप्रज्वलन करून सावित्रीबाई फुलेंच्या तसबिरीला पुष्पहार अर्पण केला. इ.४थीच्या विद्यार्थ्यांनी 'ईशस्तवन व स्वागतगीत' सादर केले. बालिकांकडून प्रतिज्ञा म्हणून घेण्यात आली. इ. ३रीच्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या जीवनातील प्रसंग, त्यांचे शिक्षण, त्यांचे विचार आपल्या भाषणातून मांडले. इ.३रीच्या विद्यार्थिनींनी 'मुलगी झाली हो' हे संगीतनाट्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी रिक्षाचालक महिला पालकांचा सत्कार आयोजित केला होता.

यावेळी ओव्हर हेड प्रोजेक्टरवर सावित्रीबाई फुलेंचा जीवनपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. शाळेतील शिक्षिका सौ. धर्माधिकारी, सौ. गांगल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्नेहल कुडव यांनी अवांतर वाचन, मोठ्यांचा आदर, आज्ञापालन, परिश्रम, शिस्त याचे जीवनातील महत्त्व आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले.

**२६ जानेवारी प्रजासत्ताक दिन** : आपल्या ६९ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त 'विजयी विश्व तिरंगा प्यारा', 'झेंडा अमुचा प्रिय देशाचा','बलसागर भारत होवो' इ. समूहगीतांचे गायन घेतले. झेंडावंदनाच्या कार्यक्रमात इ.३रीच्या विद्यार्थ्यांनी 'विठूराया आलायं पीक राखणीला' हे शेतकरी नृत्य सादर केले.

**अथर्वशीर्ष पठण** : शनिवार दि. २७/१/२०१८ रोजी उमा नीळकंठ व्यायामशाळा येथील माघी गणेशोत्सवात अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमात आपल्या शाळेच्या इ.३री व इ.४थीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

मंगळवार दि. ३० जानेवारी २०१८ रोजी प्राथमिक विभागाच्या सभागृहात 'पुस्तक प्रदर्शन' भरविण्यात आले. यावेळी राजमाता जिजाबाई, झाशीची राणी, लक्ष्मीबाई, अंतराळवीर कल्पना चावला, लो. टिळक, थोर महिला शास्त्रज्ञ, अहिल्याबाई होळकर, योगासने महत्त्व इ. पुस्तके प्रदर्शनात मांडण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीची पुस्तके प्रदर्शनातून खरेदी केली.

**शिक्षक प्रशिक्षण** : दि. १५/१/२०१८ ते १९/१/२०१८ या कालावधीत ठाणे म.न.पा. आयोजित 'वाचन क्षमता प्रशिक्षण' शाळेतील शिक्षिका सौ. कल्पना गायकवाड यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले.

दि.२२/१/२०१८ ते २५/१/२०१८ या कालावधीत ठाणे म.न.पा. आयोजित 'मुलभूत वाचन क्षमता विकास प्रशिक्षण' शाळेतील शिक्षिका सौ. ऊर्मिला परदेशी आणि सौ. सविता पाटील ह्यांनी पूर्ण केले.

---

तुमची प्रतिष्ठा जेवढी मोठी तेवढी तुमची बदनामी जास्त. – शेक्सपीअर

बुधवार दि. ३१ जानेवारी २०१८ रोजी 'मूलभूत वाचन क्षमता प्रशिक्षण' घेतलेल्या शिक्षकांनी प्रशिक्षणात सादर केलेले उपक्रम, शैक्षणिक साहित्य निर्मिती, मराठी वाचन पेटी याची माहिती शाळेतील उर्वरित शिक्षकांना करून दिली. अध्ययन, अध्यापन दर्जेदार कसे करता येईल याविषयी चर्चा करण्यात आली. आनंददायी अध्यापन करण्यासाठी संगीतमय उपक्रमाची ध्वनीफीत शिक्षकांना दाखविण्यात आली.

याच कार्यक्रमात 'नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या' प्रतिनिधीनी ई-लर्निंगच्या विविध शैक्षणिक साहित्याची ओळख प्रोजेक्टरवर करून दिली.

दि. ४ फेब्रुवारी २०१८ रोजी 'ब्राह्मण सेवा संघ' कोपिनेश्वर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'मनाचे श्लोक, मारुती स्तोत्र, अथर्वशीर्ष, फलश्रृती' वक्तृत्व व पाठांतर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**शिक्षक पालक सभा** : दि. ३ फेब्रुवारी २०१८ रोजी आपल्या शाळेच्या विद्यालंकार सभागृहात 'शिक्षक पालक' सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष मा. श्रीयुत डॉ. विजय बेडेकर यांनी पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. मराठी माध्यमाच्या शाळेत पाल्याला घातल्याबद्दल पालकांचे अभिनंदन केले. मराठी माध्यमाच्या शाळेबद्दल कमीपणा न मानता अभिमान बाळगा. विद्यार्थी अनुकरणातून शिकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जे करून नये असे आपल्याला वाटते ती गोष्ट पालकांनी स्वतः आधी करू नये, विद्या प्रसारक मंडळाच्या उपक्रमात, विविध कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आवाहन केले, पाल्याशी प्रेमाने वागा, वक्तशीरपणा, शिस्त इ. संस्कार देण्यासाठी शिक्षकांच्या मदतीने विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. शिक्षक मनापासून मेहनत करत असतात इ. विचार डॉक्टरांनी सभेत मांडले.

या सभेत माध्यमिक विभागाचे उपमुख्याध्यापक मा. श्री. पांचाळ सर यांनी पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रगतीकडे, वागणुकीकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले.

माध्यमिक विभागाच्या शिक्षिका सौ. साधना कारंडे-जोशी यांनी आपल्या रसाळ व ओघवत्या भाषेत या सभेचे सूत्रसंचालन केले. मराठीबद्दल न्यूनगंड न बाळगता अभिमान, आदर बाळगा. बाजारात किंवा बाहेर कोठेही मराठीतूनच संवाद साधावा असे सांगून शेजारी, नातलग यांना मराठी माध्यमाच्या शाळेतच आपल्या मुलांना प्रवेश घेण्याबद्दल आग्रह धरण्यास सांगितले.

या सभेत आपल्या शाळेच्या शिक्षिका सौ. गीताली अंबिके यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले.

**हार्दिक अभिनंदन** : दि. ९ फेब्रुवारी २०१८ रोजी मुंबई ग्राहक मंचातर्फे घेण्यात आलेल्या एकांकिका स्पर्धेत आपल्या शाळेतील इ.३री व इ.४थीच्या विद्यार्थ्यांनी 'सांग माणसा मी राहू कुठे?' ही एकांकिका सादर केली. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आपल्या शाळेतील शिक्षिका सौ. विनोदिनी राणे यांनी यशस्वीपणे केले. या एकांकिकेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. इ.४थी(५) मधील विद्यार्थिनी कु. दिपाली ढोके हिने पोपटाची भूमिका केली. तिने 'उत्कृष्ट अभिनयाचे' प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावले. सर्व विद्यार्थी, शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन!

**श्री रामदास नवमी** : श्री दासनवमी निमित्त ओव्हर हेड प्रोजेक्टरवर विद्यार्थ्यांना सज्जनगडाची माहिती दाखविली. श्री समर्थ रामदासांचा 'जीवनपट' दाखविला. शाळेतील शिक्षिका सौ. वैदेही गांगल यांनी समर्थांच्या कार्याची ओळख करून दिली. त्यांनी मनाचे श्लोक, दासबोध, करुणाष्टके इ. लेखन संपदा, समर्थांनी केलेली तपश्चर्या,

कुचाळखोर लोक हे बेडकासारखे असतात; प्यायचे आणि बडबडायचे एवढेच त्यांना ठाऊक. - जॉर्ज हर्बर्ट

बलोपासना, ठिकठिकाणी उभारलेली मारुतीची मंदिरे याविषयी माहिती सांगितली. समर्थ रामदास हे छत्रपती शिवरायांचे गुरू होते. ते राष्ट्रीय संत होते हेही सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांनी समर्थांनी लिहिलेले मनाचे श्लोक, गणपतीची आरती सादर केली.

**लोकशाही पंधरवडा** : दि.१२/२/२०१८ रोजी शाळेच्या सभागृहात इ.३री व ४थीच्या विद्यार्थ्यांची लोकशाही निवडणूक व सु-शासन संबंधी सतत शिक्षण कार्यक्रमा अंतर्गत 'चित्रकला स्पर्धा' घेण्यात आली.

सार्वजनिक नियमांमुळे प्रत्येकाला समाजात एखादी गोष्ट करण्याची दिशा मिळते. त्यामुळे समाजात गोंधळ न माजता समूह-जीवन सुरळीत होते. हे मुलांना पटवून दिले.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

• दि. ८ जानेवारी रोजी. इ.७वी व ८ वीच्या विद्यार्थिनींना 'पी ॲण्ड जी' कंपनीतर्फे आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला. तसेच चित्रफितीद्वारे त्याचे मार्गदर्शन करण्यात आले.

• दि. २३ जानेवारी २०१८ रोजी ग्राहक पंचायत, ठाणे विभाग यांचे तर्फे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इ. ८ वी अ मधील आकांक्षा कोंढारे हिला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. विषय होता 'जंक फूड आणि मी'.

• इ. ५ वी व ६वीच्या सर्व पालकवर्गांसाठी 'मूल्य संस्कार' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आपल्या शाळेतील शिक्षिका सौ. सुषमा बोऱ्हाडे यांनी पालकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आध्यात्मिक बैठक असणे आवश्यक कसे आहे हे सोप्या उदाहरणांतून त्यांनी पालकांना सांगितले.

• दि. १९ जानेवारी २०१८ रोजी पर्यावरण दक्षता मंच या संस्थेच्या सुरभी वालावलकर व दामिनी या दोन प्रतिनिधींनी 'पाणथळ भूमी जागृती अभियाना'साठी इ.७ अ व ब च्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दि. २ फेब्रुवारी हा 'जागतिक पाणथळ भूमी दिन' म्हणून साजरा केला जातो. ठाण्याला लाभलेला खाडीकिनारा, त्या जागी असलेली पाणथळ भूमी व त्यावरील वनस्पती यांची काळजी कशी घ्यावी, त्यांचे महत्त्व काय? हे विद्यार्थ्यांना दृक्‌श्राव्य माध्यमाद्वारे सांगितले. त्या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयाने आयोजित केलेल्या घोषवाक्य व चित्रकला स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन विज्ञान शिक्षिका सौ. अडसुळे यांनी केले होते.

• दि. ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, बालिका दिन व महिला मुक्ती दिवस म्हणून साजरा केला जातो. या निमित्त ठाण्यातील दोन महिला उद्योजिका सौ. जयश्री रामाणे व सौ. नीता कालोरे यांना आमंत्रित केले होते. सौ. रामाणे यांची स्वकर्तृत्वाने ठाण्याच्या मध्यवर्ती ठिकाणी तीन इमिटेशन ज्वेलरीची दुकाने आहेत. तसेच त्या शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षा म्हणून कार्यभार पाहतात. तर सौ. कालोरे यांचे ठाण्यात ९ ब्युटी पार्लर्स आहेत. दोन्ही अतिथींनी विद्यार्थ्यांशी हितगुज करीत त्यांना मार्गदर्शन केले.

• ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे तर्फे दि. २८ जानेवारी रोजी दादोजी कोंडदेव स्टेडिअम येथे ठाणे महापौर चषक चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ठाणे परिसरातून सदर स्पर्धेसाठी किमान २०,००० विद्यार्थी उपस्थित होते. आपल्या शाळेचे इ.८वी ते १०वीचे एकूण ४५ विद्यार्थी सहभागी झाले.

या स्पर्धेत चित्र परिक्षणासाठी आपल्या शाळेचे कलाशिक्षक श्री. कोळी यांची नेमणूक करण्यात आली होती.

---

संत आणि पापी यातील फरक एवढाच की, संतांना गतायुष्य असते आणि पापी माणसांना भविष्यकाळ असतो. - ऑस्कर वाईल्ड

• आरोग्याचा संदेश देणारा सूर्यनमस्कार उपक्रम 'ठाणे वैभव' आणि 'पितांबरी हेल्थ केअर डिव्हीजन' यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसमर्थ विद्यालयाच्या पटांगणात दि. २१ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. ठाण्यातील ३० शाळा यात सहभागी झाल्या होत्या. आपल्या शाळेतील ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच सौ. तातळे, श्री. शिंदे, श्री. तळेले या शिक्षकांनीही आपली उपस्थिती दर्शवली.

• दि. ३१ जानेवारी रोजी ठाणे वाहतूक शाखेतर्फे निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामध्ये स्मित घोलप (१०ब) यास चित्रकला स्पर्धेत पारितोषिक प्राप्त झाले.

• दि. २ फेब्रुवारी २०१८ रोजी दृक्‌श्राव्य माध्यमाद्वारे पाठ्यविषय परिणामकारकपणे अध्यापन कसे करावे याचे प्रशिक्षण सर्व शिक्षकांना ई-लर्निंगच्या माध्यमातून दिले गेले.

• इ. ५वीसाठी दि. ३१ जानेवारी रोजी अंबरनाथ येथील 'आनंदसागर' येथे एकदिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सहलीस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सहल आनंदात पार पडली.

• स्काऊट-गाईड विभागातर्फे ३० जानेवारी रोजी 'आनंद मेळा' घेण्यात आला. या मेळाव्यात स्काऊट-गाईडने तयार केलेले पदार्थ जसे भेळ, चायनीज भेळ, मंचुरियन सूप, सरबत, आइसक्रीम, पाणिपुरी, शेवपुरी, सॅण्डवीच, मंजुरियन इ. विक्रीस ठेवण्यात आले होते. या उपक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

(IPM) Institute for the Promotion of Maths-2017 मध्ये प्राथमिक विभागातून खालील विद्यार्थी मेगा फायनल परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण झाले.

| अनु क्र. | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | राष्ट्रीय क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | कु. ऋग्वेद मंदार फडके | २री | ११२वा |
| २. | कु. आदित्य समीर खानझोडे | ३री | ११वा |
| ३. | कु. निहाल समीर ठोसर | ३री | ४३वा |
| ४. | कु. अर्णव अमोल मोडक | ४थी | २३४वा |

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**आय.पी.एम. मेगा फायनल (२०१७-१८)**

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| पाचवी | हर्षल पेडणेकर | ५७ |
| सहावी | गौरव खुटवळ | २०४ |
| नववी | यश कोकाणे | १०४ |

जिज्ञासा ट्रस्ट आयोजित नॅशनल सायन्स काँग्रेसचा निकाल :

आमचा प्रकल्प 'गटर वॉटर फार्मिंग, स्लो पॉयझन टू यू प्लॅटर' राष्ट्रीय पातळीवर सादर केला गेला. हा प्रकल्प नॅशनल सायन्स काँग्रेसद्वारा जिज्ञासा ट्रस्टने आयोजित केला होता. आयुष म्हात्रे हा गटप्रमुख असून सिया चौधरी, मिहीर आगाशे, ऋतुजा पाटणकर गटामध्ये होते.

आमचे पाच विद्यार्थ्यी चीनला 'बेल्ट आणि रोड टिनएजर कॅम्प'ला 'प्रकल्प कसा बनवावा' हे शिकण्यासाठी गेले होते. आदिती पेंडसेला ''उत्कृष्ट प्रेझेंटेशनचे'', चैताली मांजरेकर आणि साशा गोरे यांना 'सर्वोत्कृष्ट मेकरचे', केदार हर्डीकर आणि अभिराज कुलकर्णी यांना 'सर्वोत्कृष्ट टीम वर्क'चे पारितोषिक मिळाले.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### संस्कृत संभाषण वर्गाचे आयोजन

वि. प्र. मं. जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयाच्या संस्कृत विभाग व संस्कृत भारती यांच्या समन्वयाने दहा दिवसांच्या संस्कृत संभाषण वर्गाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. हा वर्ग सर्वांसाठी मोफत खुला होता, यात महाविद्यालयाच्या व्यतिरिक्त इतर विद्यार्थ्यांनी देखील सहभाग घेतला होता. वयोमर्यादा नसल्यामुळे सर्वच वयोगटातील मंडळी यात सहभागी झाली. जवळपास ५० विद्यार्थी यात सहभागी होऊन त्यांनी या वर्गाला भरघोस प्रतिसाद दिला.

८ जानेवारी ते १८जानेवारी पर्यंत हा वर्ग चालविण्यात आला. १७ जानेवारी रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात संस्कृत 'शोभा यात्रेच' आयोजन केले होते. यात संस्कृत भाषेचे फलक, नाटक, आणि संस्कृत गीते सादर करण्यात आली होती. या शोभा यात्रेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ५०विद्यार्थी यात सहभागी झाले होते.



या संभाषण वर्गाचा १८/०१/२०१८ रोजी समारोप झाला. याकरिता सुप्रसिद्ध रंगकर्मी श्री. रवी पटवर्धन यांना प्रमुख अतिथी व अध्यक्षा डॉ. सुचित्रा नाईक यांना निमंत्रित करण्यात आले होते. रवी पटवर्धन यांनी संस्कृत भाषेतूनच भाषण दिले. डॉ. सुचित्रा नाईक यांनी असाच भाषेचा प्रचार प्रसार व्हावा व त्यासाठी सतत प्रयत्न करावयास हवे, विद्यार्थ्यांनी प्रथम लहान ग्रंथ वाचन करावे असा मोलाचं सल्ला दिला.

याप्रसंगी सर्व शिबिरार्थींनी अनुभव कथन, गीते, नाटक इत्यादी विविध रंगारंग कार्यक्रम सादर केले.

### आंतरमहाविद्यालयीन भगवद्गीता पठण स्पर्धेचे आयोजन

२२/०१/२०१८ रोजी विभागातर्फे आंतर-महाविद्यालयीन भगवद्गीता पठण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात मुंबई, पुणे, नाशिक आणि रत्नगिरीच्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. एकूण ४०विद्यार्थी यात सहभागी झाले. या स्पर्धेसाठी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करण्यात आली होती.



यात कनिष्ठ व वरिष्ठ असे दोन गट करण्यात आले होते आणि दोन्ही गटासाठी

प्रथम पारितोषिक २००० रुपये रोख,

द्वितीय पारितोषिक १५०० रु रोख

तृतीय पारितोषिक १००० रु रोख

उत्तेजनार्थ ५०० रु रोख असे एकूण १०,००० रुपयांची बक्षीसे ठेवण्यात आली होती. सोमय्या संस्कृत संस्थान, गोगटे जोगळेकर महाविद्यालयाने यात विशेष बाजी मारली. या स्पर्धेसाठी जोशी बेडेकर महाविद्यालयाचे इंग्रजीचे प्राध्यापक प्रशांत धर्माधिकारी, भगवद्गीतेच्या अभ्यासक सौ. माधवी कुणकीकर परीक्षक

म्हणून लाभल्या होत्या. दोघांनीही स्पर्धेचे उत्कृष्ट परीक्षण केले व योग्य तो निर्णय दिला व स्पष्टता ठेवली.

दोन्ही परीक्षकांनी स्पर्धेनंतर विद्यार्थ्यांना पठणाचे, उच्चारणाचे, सादरीकरणाचे अनेक बारकावे सांगितले.

**• लोकसत्ता वक्तृत्व स्पर्धा (राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०१८)**

या स्पर्धेची प्राथमिक फेरी ४/२/२०१८ ला संपन्न झाली. प्राथमिक स्पर्धेत एकूण ५ स्पर्धक निवडले गेले.

त्यात महाविद्यालयाच्या कु. किमया तेंडुलकर (वाणिज्य प्रथम वर्ष) हिची निवड झाली. ह्या स्पर्धेत तिनं 'अभिजात मराठीचा अर्थ' हा विषय निवडला होता.

परीक्षक म्हणून डॉ. पूर्वा प्रमोद अष्टपुत्रे यांनी काम पाहिलं. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी त्यांचे अभिनंदन केले.






• National Cartographic Association (INCA) व रुपारेल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत भूगोल विभागाचे कला द्वितीय वर्षाच्या सुधान्शु पालव व रजनीश पांडे या दोन विद्यार्थ्यांनी बाजी मारली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**गंधर्व महोत्सव**

जोशी बेडेकर महाविद्यालयात दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी सुद्धा एक वेगळी थीम घेऊन आलेला गंधर्व महोत्सव पार पडला.

गंधर्व महोत्सव हा आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव आहे.



ह्या वर्षी गंधर्व चे ११ वे वर्ष असून ह्या वर्षीची थीम 'शांतता – आयुष्यातील सौंदर्य' अशी होती.

गंधर्व हा त्याच्या सर्जनशील स्थापनेसाठी प्रसिद्ध आहे. गेले १० वर्षे हा महोत्सव कधी २ दिवस तर कधी ३ दिवस असायचा पण ह्या वर्षी हा महोत्सव १ दिवसाचा होता. ह्या वर्षी २१ इव्हेंट होते. ज्यामध्ये १ इव्हेंट शिक्षकांसाठी होता. ह्या वर्षीचे मुख्य इव्हेंट म्हणजे व्यक्तिमत्त्व स्पर्धा, अबस्ट्रॅक्ट पेंटिंग, ६ शॉट्स अ सीन, स्टोरी मेकिंग, लाईव्ह स्केचिंग, फ्लॅश मॉब, फंक फ्रॉम जंक, कल्चरल एक्सचेंज असे होते आणि ते यशस्वीरित्या पार पडले.

विविध स्पर्धांसाठी ख्यातनाम परीक्षकांनी परीक्षण केले.

गंधर्वची पूर्ण टीम – स्वयंसेवक आणि कोर कमिटी हे २ महिने खूप मेहनत घेत होते.ज्याचे फळ त्यांना ह्या १३ जानेवारी २०१८ रोजी मिळाले.

ह्या वर्षी गंधर्व महोत्सवामध्ये वेगवेगळ्या इव्हेंटमध्ये १०७ महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदविला.

ह्या वर्षीची ट्रॉफी सि.एच.एम महाविद्यालयाला मिळाली.



गंधर्वच्या संपूर्ण टीमला एका आईसारखे मार्गदर्शन करणाऱ्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि गंधर्वच्या चेअरपर्सन प्राध्यापिका अर्चना प्रभुदेसाई यांचा खूप पाठिंबा मिळाला.

गंधर्वला पितांबरी आणि कोक्यो कॅम्लिनचे सहप्रयोजकत्व लाभले.

**स्वछता अभियान**



प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली स्वछता अभियानाचे आयोजन स्टुडंट्स कौन्सिलच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात राबविले. यात एकूण १५० कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. महाविद्यालयाचे संपूर्ण प्रांगण, वर्गखोल्या, पंखे, लाईट्स फळे, दरवाजे इत्यादींची निगुतीने स्वच्छता केली व महाविद्यालय स्वच्छ सुंदर बनवले. प्रा. प्रज्ञा राजेबहदूर आणि स्वाती भालेराव यांनी विद्यार्थ्यांना मदत केली.

**पीएच.डी. प्राप्त प्राध्यापक**

- **प्रा मृण्मयी थत्ते** यांना मुंबई विद्यापीठाकडून पीएच.डी. ही पदवी ६ फेब्रुवारी २०१८ रोजी प्राप्त झाली. त्यांनी - 'Study on Performance Evaluation of Franchising Business with special reference to Food and Beverages Sector' या विषयावर आपला प्रबंध सादर केला.



- बी.एम.एम. विभागातील **प्रा. संगीता मोहंती-दास** यांना मुंबई विद्यापीठाकडून पीएच.डी. प्राप्त झाली. त्यांनी 'Professional Hazards Faced by Working Women and It's Impact on Family : Sociological Study on Women Executives of Information Technology Sector In Mumbai City' या विषयावर आपला प्रबंध सादर केला.



- **प्रा. शेफाली कोंडेवार** यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. त्यांनी 'The application of ICT in cultivation and marketing of agro products with special reference to Thane district' या विषयावर आपला प्रबंध सादर केला.



• **प्रा. विनोद चंदवानी** यांना जून २०१७ मध्ये जेजेटी विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त झाली, त्यांनी ' A study on impact of social media marketing on consumer buying behavior with reference to Thane District' या विषयावर प्रबंध लिहिला.



महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**डॉ. वा. ना. बेडेकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा २०१८**



जोशी बेडेकर महाविद्यालयातर्फे डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या जन्मदिनी म्हणजेच दि. २० फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले गेले. स्पर्धेचे हे चौथे वर्ष होते. स्पर्धेसाठी 'एक राष्ट्र – एक कर : योग्य की अयोग्य' हा विषय ठरवण्यात आला होता. या स्पर्धेसाठी प्रा. अशोक धोपेश्वरकर व प्रा. मीनल सोहोनी हे परीक्षक म्हणून लाभले होते.

या डॉ. वा. ना. बेडेकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत साठ्ये महाविद्यालयाच्या सुरज म्हशेळकर व आनंदराज घाडगे यांनी रु.५०००/– रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे प्रथम पारितोषिक जिंकत या स्पर्धेच्या विजेतेपदावर नाव कोरले. दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक रु.३०००/– रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाच्या हिमगौरी लोके व रिना पाटील या स्पर्धक जोडीने जिंकले. तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक रु.२०००/– रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या महेश दुरगुडे व समीर गुडेकर यांनी पटकावले.

यावेळी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक यांनी स्पर्धेचा आढावा घेत वादविवाद स्पर्धेच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. मानसी जंगम यांनी केले. स्पर्धेसाठी संयोजक समिती सदस्य उप–प्राचार्य सुभाष शिंदे, उप–प्राचार्या मोनिका देशपांडे, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, डॉ. प्रा. महेश पाटील, प्रा. विमुक्ता राजे, प्रा. नितीन पागी, प्रा. विनोद चांदवाणी यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या स्पर्धेसाठी विद्यार्थी प्रमुख म्हणून ओंकार मुळ्ये व विद्यार्थी सह–प्रमुख म्हणून गौरव रोकडे यांची नेमणूक करण्यात आली होती.

**फिल्म सोसायटी तर्फे Animal Farm चित्रपटाचे सादरीकरण**



जोशी बेडेकर महाविद्यालय फिल्म सोसायटीच्या वतीने जॉर्ज ऑरवेल या प्रख्यात ब्रिटिश लेखकाच्या 'ॲनिमल फार्म' या कादंबरीवर आधारित चित्रपटाचे सादरीकरण दि २३ फेब्रुवारी रोजी कात्स्यायन सभागृहात झाले. रशियन राज्यक्रांती व स्टॅलिनच्या कम्युनिझमची चिकित्सा करणारी ॲनिमल फार्म ही कादंबरी म्हणजे

विश्व साहित्यातील एक अप्रूप आहे. All are equal but some are more equal, या एकाच वाक्यात वरील चित्रपटाचं वर्णन करता येईल. स्नोबॉल, नेपोलियन, यांना अनुक्रमे ट्राट्सकी व स्टॅलिन अशा व्यक्तिरेखानी साकारलं आहे. क्रांतीचा मार्ग हा किती खाचखळग्यांनी भरला आहे व नेहमी शोषणातूनच हा मार्ग जातो असं काहीसं चित्र या चित्रपटात चितारले आहे. हा चित्रपट ग्रेग स्मिथ व रॉबर्ट हालमी या प्रख्यात दिग्दर्शकांनी साकारला आहे.

ॲनिमल फार्म या चित्रपटाच्या सादरीकरणाने विद्यार्थ्यांना ही कादंबरी समजण्यास अधिक मदत झाली. विद्यार्थ्यांनी या चित्रपटात त्यांना भावलेल्या व्यक्तिरेखा, तसेच चित्रपट व कादंबरी यांच्यात असलेलं प्रकटीकरण व आशयातील साम्य या विषयावर मत व्यक्त केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले. बी.एम.म. विभागातील (मराठी व इंग्रजी) विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने चित्रपटाचा आस्वाद घेतला.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

• प्रथम विधीच्या प्रथम सत्राचे वर्ग अनुक्रमे १ नोव्हेंबर व २ डिसेंबर, २०१७ रोजी सुरू करण्यात आले. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे प्रथम सत्राच्या परीक्षा वेळेवर घेण्यात आल्या. त्याप्रमाणे त्या २९ जानेवारी ते ५ फेब्रुवारी दरम्यान घेण्यात आल्या. प्रथम सत्राचे वर्ग दिनांक २० जानेवारी पर्यंत घेण्यात आले व त्यांची पूर्वपरीक्षा दिनांक २२ ते २५ जानेवारी रोजी घेण्यात आली. त्याचप्रमाणे याच तारखे दरम्यान मराठीमध्ये देखील विशेष शिकवणी वर्ग घेण्यात आले.

• प्रात्यक्षिक परीक्षा : द्वितीय विधीचे प्रात्यक्षिक वर्ग व अशील मुलाखत परीक्षा दिनांक १० जानेवारी ते १६ जानेवारी या दरम्यान घेण्यात आली. तसेच तृतीय विधीचे प्रात्यक्षिक वर्ग दिनांक १० ते २७ जानेवारी पर्यंत घेण्यात आले.

• महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी पलक गुप्ता हिने खालील स्पर्धेमध्ये भाग घेऊन ती यशस्वी केली.

१. MLDC वक्तृत्व स्पर्धा - दुसरे पारितोषिक (२७ जानेवारी, २०१८)

२. नानी पालखीवाला राज्य स्तरिय वकृत्व स्पर्धा - तृतीय पारितोषिक (२८ जानेवारी, २०१८)

तसेच महाविद्यालयाचे विद्यार्थी अक्षत श्रावत, जुई शहा, गौरी दुदुसकर यांनी पनवेल येथील विलफिल्ड विधी महाविद्यालय आयोजित अभिरुप न्यायालय स्पर्धेत सहभाग घेतला.

• पुणे येथील भारतीय छात्र संसदेमध्ये नीरज पांडे, मनीष उज्जैनकर व कुणाल पाटील यांनी भाग घेतला.

• पुणे येथील शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय आयोजित वकृत्व स्पर्धेत मधुसूदन शेट्टी याने द्वितीय पारितोषिक मिळविले. सदर स्पर्धा दिनांक २०/१/२०१८ रोजी पार पडली.

• पुणे येथील शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय आयोजित अभिरूप न्यायालय स्पर्धेत पलक गुप्ता, मनीष भोजवाणी व अंकीत दिंडोले यांनी भाग घेतला.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### शिक्षकांकरिता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनातील विद्युत शाखेने नुकतेच शिक्षकांकरिता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. Virtual Lab for Polytechnic हा

या प्रशिक्षणाचा विषय होता. सदरचा कार्यक्रम महाराष्ट्रातील तंत्रनिकेतनातील सर्व प्राध्यापकांकरिता आयोजित केला होता. सदर प्रशिक्षणाचा कालावधी ८ - १२ जानेवारी २०१८ असा होता. हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांच्या आर्थिक सहकार्याने पार पडला. एकूण २८ प्राध्यापक यात सहभागी झाले होते. या प्रशिक्षणाकरिता नामवंत आय.आय. टी. मुंबईतील अध्यापकांना निमंत्रित केले होते. एक दिवस आय.आय. टी. मुंबईतील प्रयोगशाळांना भेट देण्यात आली. या प्रयोगशाळा Virtual Lab व Remote control Lab अशा दोन स्वरूपात पाहायला मिळाल्या.



विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन हे महाराष्ट्रातील पहिलेच तंत्रनिकेतन आहे की जेथे Virtual Lab चे नोडल सेंटर चालविले जाते. मनुष्यबळ विकास मंत्रालय व आय. आय. टी. मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प सबंध भारतभर कार्यरत आहे.

डिजिटल इंडियाच्या पार्श्वभूमीवर तंत्रनिकेतनने उचललेले हे पाऊल नक्कीच प्रशसंनीय आहे.

या कार्यक्रमाकरिता तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. डी. के. नायक, विभाग प्रमुख सौ. निशा वडेर व नोडल कोऑर्डिनेटर सौ. सुषमा कुलकर्णी यांनी सहकार्य केले.

**"Advancement in Renewable Energy Technologies' या विषयाची २० वी राष्ट्रीय परिषद संपन्न**

विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे येथील इलेक्ट्रिकल पावर सिस्टम (EPSEPSEPS) विभागातर्फे २० व्या Advancement in Renewable Energy Technologies' या विषयीची राष्ट्रीय परिषद दिनांक २२ डिसेंबर २०१७ रोजी बाजीराव पेशवे सभागृह कॉलेज कॅम्पस ठाणे येथे सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत पार पडली. सदर परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनुराधा गणेश (संचालक, Adv. Engg. Cummins Technologies India Ltd.) उपस्थित होत्या. त्यांचे शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थित परिषदेचे उद्घाटन करण्यात आले.




डॉ. चेतन सिंग सोलंकी (प्रोफेसर, एनर्जी सायन्स आणि अभियांत्रिकी आय. आय. टी. मुंबई) हे प्रमुख वक्ते म्हणून हजर होते.

शिवाय श्री. सुनील पोटे (उप - शहर अभियंता, (इलेक्ट्रीकल) महानगरपालिका, ठाणे.) श्री. श्यामसुंदर व्ही. देव (माजी. संचालक सुझलॉन) आणि डॉ. व्ही. आर. कानेटकर (सल्लागार, टेक्निकल सर्विसेस व्हर्तिव एनर्जी प्रा. लिमिटेड, ठाणे) इत्यादी त्या त्या विभागातील तज्ज्ञ मंडळी परिषदेस उपस्थित होती.

जवळ-जवळ २५ शोध-निबंधापैकी १६ जणांनी आपले शोध-निबंध परिषदेत सादर केले.

•••

जेव्हा सर्वांचेच चुकते, तेव्हा सर्वांचेच बरोबर असते. - सिनेका

# स्वप्न साकारत आहे...

हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे! तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला,
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्री सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणी वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

**– डॉ. वा.ना. बेडेकर**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❈ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❈ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❈ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❈ संपर्क ❈

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.